MAHMAR/ 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सोळावे / अंक ६ / जून २०१५

## संपादकीय

### हसत-खेळत शिक्षण

या वर्षीच्या दहावी-बारावीच्या निकालांनी एक मोठी सामाजिक क्रांती पूर्ण केली. नव्वद टक्क्यांच्या वरती निकालच नाही, तर प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणी असलेल्या विद्यार्थ्यांमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. आता शिक्षण किंवा गुणांची मक्तेदारी एका वर्गाकडे राहिली नसून त्याचे सार्वत्रिकीरण झाल्यामुळे या निकालाचे स्वागतच करायला हवे. सर्वसाधारणपणे या घटनेचे सर्वांनीच स्वागत केले आहे. काही जणांनी लाजत, मुरडत अगदी सावधपणे गुणवत्तेचा प्रश्न उभा केला. अर्थातच राजकारणी आणि अनेक शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केलेली मते आणखीन क्रांतिकारक आहेत. संगणकाच्या क्षेत्रामध्ये एक 'वास्तव' आणि दुसरी फक्त 'कल्पित' (Virtual) असे घटक असतात. या कल्पिततेच्या कल्पक दुनियेमध्ये तुम्ही काहीही करू शकता. तरीही वास्तवाचे जग हेच खरे धरले जाते. एखाद्याचा पगार संगणकाच्या माध्यमातून त्याच्या बँकेत जमा होत असला, तरी वास्तवात त्याला ते पैसे मिळालेले असतात आणि तो ते खर्चही करू शकतो. जीवनाच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर कल्पनेपेक्षा वास्तवच स्वीकारावे लागते.

'आधुनिकता' आणि 'परंपरा' यांच्या समजुतीचा वाद घालणे हा विचारवंतांचा एक आवडता छंद आहे, आणि विचारवंत हे जर का वर्गकलहवादी विचारांचे पाईक असतील; तर मग विचारायलाच नको. त्यांच्या दृष्टीने १९५० च्या आधीचा बहुतेक भारत हा वर्गश्रेष्ठत्वाच्या सामाजिक चौकटीमध्ये बद्ध असल्यामुळे अत्याचार, दडपशाही यांपलीकडे समाजात फारसे काही घडतच नव्हते. याआधीचे शिक्षण हे त्याचाच एक भाग असल्यामुळे, त्यामध्ये गुणवत्तेचा बाऊ करून, कावेबाजपणे ते एका वर्गापर्यंतच सीमित करण्यात आले होते. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. तरीही या प्रक्रियेमध्ये राहिलेल्या त्रुटी दूर करण्याकरता आपले शिक्षणमंत्री आता सरसावले आहेत.

डोक्यावरच्या गुणवत्तेचे ओझे एकदा दूर केल्यावर, त्यांचे लक्ष आता पाठीवरच्या ओझ्याकडे गेले आहे. याचा अत्यंत गंभीरतेने अभ्यास करणारे क्रांतिकारक विचारवंत एकत्र येऊन, आता हे ओझेही इतिहासजमा करण्याचा चंग त्यांनी बांधला आहे. वास्तविक हजारो कोटी रुपयांचा खर्च सरकार शिक्षकांवर करते. यामुळे पुस्तक, वह्या, लिखाण यांची शिक्षणाकरता फारशी आवश्यकता असूच नये. शिवाय तंत्रज्ञानही आपल्या मदतीला येऊ शकते. एखाद्या लघुसंगणाकामधे हे सर्व ज्ञान संकलित करून, असा लघुसंगणक रयतेला फुकट वाटून, पाठीवरचे हे ओझे लवकरच इतिहासजमा होईल यात आता शंका नाही.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

शाळा आली की गणवेश आलाच. सध्या या गणवेशाकरता प्रत्येक विद्यार्थ्यामागे फक्त ४०० रु. खर्च होतो. वाढत्या महागाईचा विचार करून ते अनुदानही आता दुप्पट करण्याचा विचार आहे. शिवाय मधल्या सुटीमध्ये मुलांना सकस (?) आहारही मायबाप सरकार फुकट पुरवीतच आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणूनच मुलांची गुणवत्ता वाढून या निकालांमध्ये प्रकट होताना दिसत आहे, असेच सरकार सुचवीत आहे.

एवढेच करून सरकार थांबत नाही, तर आता प्रत्येक विद्यार्थ्याला वयाच्या १४ वर्षापर्यंत शिक्षणाचा अधिकारही सरकारने देऊन टाकला आहे. आता हे एक मोठे गौडबंगाल आहे. वास्तविक मनुष्य जन्माला येतो तो त्याचा हा अधिकार घेऊनच जन्माला येतो. वर्णश्रेष्ठत्ववाद्यांनी असा एक गैरसमज करून दिला होता की, निरीक्षण, अनुभव आणि संस्कार हासुद्धा शिक्षणाचा महत्त्वाचा गाभा असून त्यामुळेच मुलांचे व्यक्तिमत्त्व विकसित होते. शिवाय याआधीही अगदी वसाहतवादी सरकारनेसुद्धा मुलांना शाळेत जाण्याकरता प्रोत्साहित केलेच होते. तेव्हा हा अधिकार भारतातल्या नागरिकाला आपल्या सरकारने दिला म्हणजे काय झाले? हे थोडेसे अनाकलनीय आहे. अर्थातच सरकार यामध्ये ''फुकट'' हा शब्दप्रयोग करायला विसरलेले नाही. गेली अनेक वर्षे सरकारी अनुदानाच्या शाळा या फुकटच आहेत, आणि या फुकट शाळा असल्या, तरीही गेल्या काही दशकांमध्ये खाजगी शाळा या कितीतरी पटीने वाढल्या आहेत. कुठलीही फी ही ''भरमसाटच'' असते. जे फुकट नाही ते सर्व भरमसाटच. एवढा सरकारचा खटाटोप चालू असतानाही पालकांचा खाजगी शाळांकडे ओढा का आहे हे सांगणे फार कठीण आहे. एवढे करूनच हा 'क्रांतिकारक' अधिकार थांबत नाही, तर आठवीपर्यंत कुठल्याही विद्यार्थ्याला नापास करायचे नाही असा फतवाही सरकारने जाहीर केला. आता हे आठवीला का थांबते, हाही एक मोठा गहन प्रश्न आहे. शिवाय यामध्ये पहिली, दुसरी, तिसरी इयत्ता ही श्रेणीही अजून शिल्लक आहे. यामध्येही कुठेतरी, प्रस्थापितांचा वर्गकलह दडलेला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संकल्पनेचाही पुनर्विचार करून प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाला शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याकरता त्याला शाळेतील प्रवेशाबरोबरच ८ वी पर्यंतचे प्रमाणपत्र देऊन टाकावे. यामुळे विद्यार्थी संपूर्ण तणावमुक्त होईल आणि जन्माबरोबरच त्याला मिळालेल्या या अधिकाराचा त्याला खरा साक्षात्कार होईल.

सरकार तर आता याहीपुढे गेले आहे. मुलांनी आपल्या लहान वयात खेळावे-बागडावे आणि तेही कुठल्याही दडपणाशिवाय, असे सरकारचे ठाम मत आहे. जगातल्या अनेक मानसशास्त्रज्ञांनीही यावर शिक्कामोर्तब केले आहे. याकरता रस्त्यारस्त्यावर गणपतिउत्सव, नवरात्र उत्सव आणि त्याहीपेक्षा खेळाचे महत्त्व पटवणारा 'दहीहंडी' उत्सव साजरा करण्याचा कार्यक्रम सगळ्याच राजकीय पक्षांनी हातात घेतला आहे. याच हेतूंनी प्रेरित होऊन सांस्कृतिक खातेही सांभाळणाऱ्या आपल्या शिक्षणमंत्र्यांनी आता दहीहंडीला 'साहसी खेळ' म्हणून जाहीर करून टाकले आहे. आणि हे सर्व सुकर व्हावे म्हणून, आता पाल्य सहा वर्षांचा होईपर्यंत त्याला पहिलीत प्रवेश मिळणार नाही. राहता राहिला प्रश्न ९ वीचा. या शैक्षणिक क्रांतीमध्ये कुठलीही शाळा, जरी परीक्षा घेतली तरी, नववीत मुलाला नापास करण्याची सुतराम शक्यता नाही. तसा प्रयत्न अलीकडे काही शाळांनी केल्यावर त्यांच्या ह्या निर्घृण कृत्याचा जाब प्रगतिशील वृत्तपत्र आणि राजकारणी, विद्यार्थी आणि पालकांची बाजू घेऊन मांडतच आहेत.

पाठीवरचे वजन कमी झाले, गणवेश मिळाला, शिक्षणाचा अधिकार मिळाला, दुपारचे जेवण फुकट मिळाले, शाळांमधून स्वच्छतागृहांची कमी होती, तोही प्रश्न आता तातडीने सरकारने हातात घेतला आहे.

(पृष्ठ क्र. ३९ वर)

व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सोळावे / अंक ६ / जून २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक १२वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | कुचीटनेल, व्हिएतनाम | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | मूल्यवेध-०४ : प्राधान्य | श्री. नरेंद्र गोळे | ८ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १६) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ५) | कंबोडिया एक भयानक सत्य (भाग २) | श्री. संदीप कुलकर्णी | १३ |
| ६) | Robot - मानवी उत्क्रांतीची चौथी क्रांती २०१५ पासूनची | श्री. ह. श्री. परांजपे | १६ |
| ७) | भारतीय नियोजन आयोग आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे अर्थ-राजकीय भवितव्य | अर्पणा कुलकर्णी-धर्माधिकारी | १८ |
| ८) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २० |
| ९) | छत्रपती शिवाजी महाराज | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २९ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# कुची टनेल, व्हिएतनाम

*व्हिएतनाममधील कुची टनेल शहराचे प्रवासवर्णन करणारा लेख - संपादक*

व्हिएतनाममध्ये यादवी युद्धाला तोंड लागले. त्यामध्ये उत्तर विरुद्ध दक्षिणअसा वाद होता. उत्तरेकडील लोक कम्युनिस्ट राजवटीचे पुरस्कर्ते होते तर दक्षिणेकडील लोक त्याचे विरोधक होते. या दोघांच्या वादात अमेरिकेने शिरकाव केला. खरेतर त्याना पाचारण करण्यात आले होते. उत्तरेकडील सैन्याच्या हल्ल्यात आपला निभाव लागणार नाही हे ओळखून दक्षिणेकडील पुढाऱ्यांनी अमेरिकेकडे मदत मागितली. त्यांच्या विनंतीला मान देऊन अमेरिकेने सैनिकी साहाय्य देऊ केले. अमेरिकी सैनिक आणि उत्तर व्हिएतनामी कार्यकर्ते यांच्यात देशाच्या दक्षिण भागात तुंबळ युद्ध झाले. व्हिएतनामच्या भेटीत या भागाला भेट देण्याची मला संधी मिळाली. त्यावर आधारित हा लेख आहे.

अमेरिका सैनिक मोठ्या प्रमाणात बाँबवर्षाव करीत असत. त्यापासून संरक्षण करण्यासाठी व्हिएतनामी लोकांनी बोगदे खोदले. त्याचबरोबर, शत्रुपक्षातील येणाऱ्या सैनिकांना पडण्यासाठी त्यांनी खंदक खोदले. जंगलात लपून राहून अचानक ते अमेरिकी सैन्यावर चाल करून जात असत. ही पद्धत शिवाजी महाराजांनी आपल्या स्वातंत्र्ययुद्धात वापरली होती. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन व्हिएतनामी स्वातंत्र्यसैनिकांनी अमेरिकन फौजांना सळो की पळो करून सोडले. अमेरिकी सैन्य बलाढ्य होते. युद्धसाहित्याची त्याला ददात नव्हती. त्या मानाने व्हिएतनामी योद्धे अप्रशिक्षित होते. युद्धसामग्री त्यांच्याकडे तुटपुंजी होती. तरी त्यांनी यश मिळविले. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ हेच त्यांनी जगाला दाखवून दिले. युद्धकाळातील युक्तिस्थान म्हणजेच कुची टनेल होय.

कुची टनेल हे ठिकाण हो चि मिन्ह शहराच्या उत्तरेला कुची नावाच्या जिल्ह्यात आहे. शहरापासून त्याचे अंतर असावे साधारणपणे ६० किलोमीटर. शहरातील अनेक ट्रॅव्हल कंपन्या या सहलीचे आयोजन करतात. त्यांपैकी एका कंपनीत पैसे भरून अर्ध्या दिवसाची सहल आम्ही आरक्षित करून ठेवली होती. त्यांच्या सूचनेनुसार दुपारी एक वाजता आम्ही त्यांच्या कार्यालयात पोहोचलो. थोड्याच वेळात आमची सहल शहराच्या मध्यभागापसून सुरू झाली. गावातले रस्ते चांगलेच रुंद आहेत. परंतु वाहनांची संख्याही तेवढीच आहे. विशेषतः दुचाकी वाहनांची संख्या खूपच जास्त आहे. वाहतुकीचे नियम तेथे फारसे पाळले जात नाहीत. त्यामुळे, शहरातून बाहेर पडायला जरा वेळ लागला. एकदा शहराच्या बाहेर पडलो की आजूबाजूचा परिसर संपूर्णपणे बदलून जातो. शहरातील उंच उंच इमारतींऐवजी लहान लहान घरे दिसू लागतात. आजूबाजूला भाज्यांचे मळे आहेत तसेच भातशेतीही आहे.



**शहराच्या बाहेर असलेले भाज्यांचे मळे**

शहराच्या बाहेर पडल्यानंतर आमची बस विश्रांतीसाठी एका ठिकाणी थांबली. या कामासाठी अगदी

आयुष्यात अनेक संधी चालून येतात. आपण जर का त्या पकडल्या नाहीत तर दोष आपला आहे. या संधी पकडण्यासाठी आपण नेहमी तयार असले पाहिजे. नंतर दैवाला दोष देण्यात काय अर्थ आहे ?

योग्य अशी जागा निवडण्यात आली होती. कारण ते हस्तशिल्पविक्रीचे ठिकाण होते. अपंग व्यक्तींना काम देऊन त्यांच्याकडून कलाकुसरीची कामे करून घेणारी एक संस्था आहे. त्या संस्थेचे ते वर्कशॉप होते. तेथे अनेक अपंग व्यक्ती काम करीत होत्या. शेंगदाण्याची टरफले, अंड्यांचे कवच, फेकून दिलेले प्लॅस्टिकचे तुकडे अशा अल्प किमतीच्या वस्तूंचा वापर करून ते सुंदर अशा कलाकृती निर्माण करीत होते. अपंगांना स्वावलंबी करण्याचा हा फारच चांगला मार्ग आहे असे मला वाटले. बसमध्ये असलेल्या अनेक प्रवाशांनी तेथे खरेदी केली. मीदेखील माझ्या घराच्या दिवाणखान्यात लावण्यासाठी एक चांगली वस्तू खरेदी केली.



**हस्तशिल्प बनविताना स्थनिक कारागीर**



**अपंग लोकांनी बनविलेल्या वस्तू विकण्याचे दुकान**

अपंगांच्या दुकानाला भेट देऊन झाल्यावर आमची बस पुन्हा मार्गस्थ झाली. साधारणपणे दीड तासाचा प्रवास करून आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो. बसच्या बाहेर पडताच आमच्या नजरेस पडले ते जंगल. रानटी वनस्पतींनी व्यापलेले ते विरळ असे जंगल होते. या जंगलाचा आसरा घेऊनच व्हिएतनामी लोकांनी अमेरिकन फौजांचा प्रतिकार केला. ते जंगल आता एक प्रेक्षणीय ठिकाण झाले आहे. त्यात प्रवेश करण्यासाठी शुल्क आकारण्यात येते. प्रवेशाचे तिकीट घेऊन आम्ही आत गेलो. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर अरुंद वाटेने पुढे जावे लागते.



**जंगलातील अरुंद वाट**

या प्रेक्षणीय स्थळाची माहिती देणारा आमचा एक तरुण मार्गदर्शक होता. त्याने आम्हांला प्रथम एका झोपडीत नेले. ते खरेतर एक सभागृह होते. तिथे सर्वांना बसवून मार्गदर्शकाने त्या परिसराची माहिती द्यायला सुरुवात केली. एका नकाशाच्या आधारे त्याने जंगलात पाहण्यासारखी कोणकोणती ठिकाणे आहेत याची माहिती दिली. जंगलात कोणत्या ठिकाणी बोगदे खोदलेले आहेत याची माहिती त्याने आम्हांला सांगितली. त्या काळात बोगदे खोदण्यासाठी आजच्यासारखी यंत्रसामग्री नव्हती. केवळ कुदळ आणि फावडा वापरून त्यांनी हे बोगदे खोदले या बाबीवर त्याने विशेष भर दिला. व्हिएतनामी लोकांच्या कष्टाचे कौतुक करीत आम्ही त्या झोपडीच्या बाहेर पडलो. युद्धकाळात व्हिएतनामी लोकांनी बनविलेले

खूप कमी लोक आपल्या आयुष्यात सुख आणि आशीर्वाद घेऊन येतात. पण खूप जास्त लोक आपल्याला कटू अनुभव आणि शिकवण देण्यासाठी येतात...

बोगदे प्रत्यक्ष डोळ्यांनी बघण्याची उत्सुकता आमच्या मनात निर्माण झाली होती.




**महत्त्वाच्या ठिकाणांच्या जागा दाखविणारा नकाशा**

जंगलातल्या अरुंद वाटेने आम्ही चालत होतो. दोन्ही बाजूला उंच उंच झाडे होती. पुढे चालत जाऊन आमचा गाईड एका ठिकाणी थांबला. थोड्याशा सपाट असलेल्या जागेकडे बोट दाखवून तिथे बोगदा असल्याचे त्याने सांगितले. आम्ही तिकडे नजर टाकली तर तिथे पालापाचोळा पडलेला आमच्या दृष्टीस पडला. आमच्या चेहऱ्यावर उमटलेले प्रश्नार्थक भाव त्यांने ताडले असावेत. पटकन पुढे जाऊन त्याने झाकण उघडले आणि बोगद्याचे मुख आम्हांला दाखविले. आमच्या गटात वेगवेगळ्या देशांतून आलेले पर्यटक होते. त्यांतील युरोपमधून आलेले पर्यटक पटकन पुढे आले आणि झाकण उघडून खाली जाऊ लागले. गाईडने त्यांना काही सूचना दिल्या आणि बाकीच्या लोकांना काही अंतरावर असलेल्या बोगद्याच्या दुसऱ्या मुखाजवळ उभे राहायला सांगितले. थोड्याच वेळात एकेक जण बाहेर येऊ लागला. त्यांच्या चेहऱ्यावर काहीतरी साध्य केल्याचा आनंद होता. आम्ही ही संधी उगीचच गमावली याचे आम्हांला वाईट वाटले. परंतु पुढे अजून अनेक बोगदे आहेत असे आमच्या गाईडने सांगितले. त्यामुळे आमची निराशा पळून गेली आणि आम्ही त्याच्या मागे चालू लागलो.



**बोगद्याचे मुख**



**बोगद्यात असे उतरावे लागते**

लवकरच आम्ही एका मोठ्या बोगद्याजवळ पोहोचलो. येथे बोगद्याच्या मुखाजवळ पायऱ्या बांधल्या होत्या. आतील वाट दिसण्यासाठी विजेचे दिवे लावले होते. हे ठिकाण सुरक्षित वाटल्याने आम्ही सर्वांनी आत जायचे ठरविले. बोगदयात उतरण्यासाठी पायऱ्या केलेल्या होत्या. त्यामुळे उतरणे सोपे झाले. परंतु खरी अडचण पुढेच होती. आम्ही ज्या बोगदयात शिरलो तो फारच अरुंद होता. अवघडलेल्या अवस्थेत आम्ही पुढे पुढे जात होतो. थोडे अंतर गेल्यावर बाहेर जाणारी एक वाट दिसली. आमच्यातले काही जण त्या वाटेने बाहेर पडले. आम्ही मात्र पुढे जात राहिलो. काही अंतर गेल्यावर बाहेर जाणारी वाट दिसली. त्या वाटेने आम्ही बाहेर पडलो.

---

माणसाला बोलायला शिकण्यास (किमान ) २ वर्षे लागतात. पण काय बोलावे हे शिकण्यात पूर्ण आयुष्य निघून जाते.



**बोगद्यातून बाहेर पडणारा एक पर्यटक**

बोगदयाचा अनुभव घेऊन झाल्यावर आम्ही आमचा मोर्चा शेजारच्या झोपड्याकडे वळविला. या झोपड्यांमधये काही कारागिरांचे पुतळे होते. धातूंच्या लहान लहान तुकड्यांवर काम करणारे ते कारागीर होते. युद्धात लोखंडी साहित्याचे लहान लहान तुकडे होऊन सगळीकडे पसरत असत. हे तुकडे गोळा करून त्यांपासून नवीन युद्धसाहित्य बनविण्यात येत असे. हे दाखविण्यासाठी भंगारातले तुकडे तसेच चांगल्या अवस्थेतील वस्तू यांचे नमुने ठेवले होते. या झोपडीतून बाहेर पडताना आमच्या नजरेस पडला तो एक रणगाडा आणि त्याच्याशेजारी उभे असलेले सैनिक. त्याच्याशेजारी उभे राहून आम्ही सर्वांनी फोटो काढून घेतले.



**सुरक्षित ठेवलेला रणगाडा**



**युद्धसाहित्य बनविणारे कारागीर**

चालत चालत आम्ही शूटिंग रेंजजवळ पोहोचलो. येथे खूप मोठी मोकळी जागा आहे. आजूबाजूची झाडे तोडून ही मोकळी जागा निर्माण केली असावी असे वाटते. व्हिएतनाम युद्धात वपरलेल्या काही बंदुका तेथे ठेवलेल्या आहेत. कुणाला त्या चालवून बघायच्या असतील तर तशी सोय केली जाते. त्यासाठी अर्थातच शुल्क आकारण्यात येते. आमच्यातील काही मंडळी तिकडे गेली. आम्ही मात्र तेथे विक्रीला ठेवलेल्या वस्तूंचे निरीक्षण करू लागलो. व्हिएतनाम युद्धाची माहिती देणारी पुस्तके तेथे विक्रीला ठेवलेली होती. त्याचबरोबर, स्थानिक लोकांनी बनविलेल्या वस्तूदेखील तेथे विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. स्वच्छतागृहे, खाद्यपदार्थ विक्री केंद्र अशा सुविधा तेथे आहेत. जंगलात फिरून झाल्यानंतर पर्यटकाना विश्रांती घेता यावी यासाठी सगळी सोय येथे करून ठेवलेली आहे. त्याची सर्वांना गरज होतीच.



**शूटिंग रेंज आणि विश्रांतिस्थळ**

पैसा हा मुंगीच्या पायाने येतो आणि हत्तीच्या पायाने जातो.

विश्रांती घेऊन ताजेतवाने झाल्यानंतर आम्ही परत भटकंती करायला निघालो. वाटेत आम्हांला दोन महत्त्वाची ठिकाणे पाहायला मिळाली. त्यांतील एक होते शत्रूला फसविण्यासाठी स्थानिक लोकांनी केलेली युक्ती. एखाद्या ठिकाणी धूर दिसला की येथे मानवी वस्ती असावी असे आपल्याला वाटते. या गोष्टीचा फायदा घेऊन व्हिएतनामी सैनिकांनी जागोजागी धूर निर्माण करणारी यंत्रणा निर्माण केली. या आगीने वणावा पेटता कामा नये, त्याचबरोबर बाहेर पडणारा धूर हा स्वयंपाकघरातून येणारा धूर वाटला पाहिजे अशी नियंत्रित व्यवस्था करण्यात आली होती. याहीपेक्षा आश्चर्यकारक बाब म्हणजे जंगलात खोदलेले खंदक. जंगलात लपून बसलेल्या व्हिएतनामी सैनिकांचा शोध घेण्यासाठी अमेरिकन सैन्य जंगल पिंजून काढत असत. ते जेव्हा जंगलात यायचे तेव्हा त्यांतील बरेचसे सैनिक खंदकात पडायचे. वरून दिसायला सपाट जमीन दिसते. त्यावर गवतदेखील वाढवलेले असते. परंतु पाय ठेवताच आपण खंदकात पडतो. ख़ंदकात लोखंडी सुळे ठेवलेले असत. त्यामुळे खंदकात पडलेल्या सैनिकाला बाहेर पडणे अशक्य होत असे.



**खंदकाची प्रतिकृती**

जंगलातून फिरताना वेळ कसा गेला हे आम्हांला कळलेच नाही. दिवेलागणीची वेळ व्हायला लागली होती. घनदाट जंगालामुळे तर संध्याकाळ झाली असेच आम्हांला



**झाकण उघडलेले खंदक**

वाटत होते. त्यामुळे परतीची वाट धरणे आवश्यक होते. परंतु मनात अनेक प्रश्न निर्माण झाले होते. त्यांची उत्तरे मिळविल्याशिवाय मला समाधान लाभणार नव्हते. म्हणून मी आमच्या मार्गदर्शकाला गाठले. जंगलातून निघून बसजवळ येईपर्यंत आमची चर्चा चालू होती. त्या चर्चेतून मला अनेक मनोरंजक गोष्टी माहीत झाल्या.

व्हिएतनाम युद्ध अनेक वर्षे चालले. १९६६ ते १९७३ एवढ्या मोठ्या कालावधीत बलाढ्य अमेरिकन सैनिकांपुढे टिकाव धरून राहणे हे साधे काम नव्हते. बोगद्यांनी त्याना स्वतःचे संरक्षण करण्याचे साधन मिळवून दिले. अनेक वर्षे अमेरिकन सैनिकांना या बोगद्यांची माहितीच नव्हती. काही जणांनी त्यांच्या शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही. शेवटी एका ऑस्ट्रेलियन अधिकाऱ्याला या बोगद्यांची महिती मिळविण्यात यश आले. त्यांची रचना, त्यांमधील सुविधा हे पाहून तर तो चक्रावूनच गेला. त्यानंतर बोगद्यात जाऊन तेथे असलेल्या लोकांचा शिरच्छेद करण्याचा सपाटाच त्यांनी लावला. या कामी व्हिएतनामी सैनिकांबरोबरच अनेक अमेरिकन सैनिक मारले गेले. या युद्धात कामी आलेल्या सैनिकांची संख्या खूप मोठी आहे. एका आकडेवारीनुसार या युद्धात सुमारे ५३ हजार व्हिएतनामी

(पृष्ठ क्र. १० वर)

# मूल्यवेध-०४ : प्राधान्य

*व्यक्तीने समष्टीच्या सोयीनुसार आपले अग्रक्रम ठरवल्यास, संपूर्ण समाजाचीच उन्नती सहज साधली जाऊ शकते याचा ऊहापोह करणारा लेख - संपादक*

उपजीविकेला बांधलेला माणूस सतत काही ना काही काम करत असतो. मात्र आज, आत्ता, ताबडतोब करावयाच्या कामाची निवड ज्याची त्याची स्वतंत्र असते. ते त्याच्या स्वभावाचे व्यवच्छेदक लक्षण असते. एवढेच नव्हे, तर त्याला लाभणाऱ्या यशाचा ती मूलाधार असते. म्हणूनच सर्व प्राणिमात्रांना सर्वाधिक हितकर अशा प्राधान्याची निवड करणे, म्हणजेच आपापला प्राधान्यक्रम ठरवणे, हल्ली अत्यंत मोलाचे झाले आहे. पूर्वी सर्वच गोष्टींना मर्यादित पर्याय उपलब्ध असत. मानवी समाज जसजसा उन्नत होत गेला, प्रगत होत गेला, तसतशी मानवी आयुष्यातील समृद्धी वाढली आणि अनेकानेक पर्याय खुले होत गेले. प्राधान्याचे मूल्य वाढले. योग्य निवड करणारा झपाट्याने समर्थतेप्रत पोहोचू लागला, तर अयोग्य निवड करणारा अगतिक होऊन गेला. त्याकरताच, आपण आपल्या जीवनात प्राधान्यक्रम कसा ठेवावा ह्याची चर्चा करणारा हा लेख आहे.

भारतातील बहुसंख्य लोक आजही खेड्यापाड्यांतून राहत असतात. थोर नामदार, जमीनदार, वतनदार, मालगुजारही त्यात समाविष्ट आहेत. तेथील परंपरागत मानमान्यतांनुरूप कित्येकदा त्यांच्या घरांतही शौचकूप असत नाहीत. घरातील सर्वच जण प्रथेनुसार, परसाकडे जाऊनच स्वच्छता साधत असतात. त्यांच्या घरांतून नव्या धारणांना अनुसरून टी.व्ही. असतो, मोबाइल असतात, शेतीसुद्धा ट्रॅक्टरने केली जात असते. मग केवळ शौचकूपाकरताच जुन्या मान्यतांचा आसरा का घेतला जात असेल? तर प्रत्येकास कायमच एका प्रकारच्या स्थितिस्थापकत्वाने जखडलेले असते. कुठल्याही बदलास त्याचा प्रथमदर्शनी विरोध असतो. मात्र प्राधान्यक्रमाबाबत त्यांची गल्लत होत असते. आधुनिक समाजात घरात शौचकूप बाळगणे आणि तो अतोनात स्वच्छ राखणे, ह्यास अग्रक्रम दिला जात असतो. आधुनिक समाज त्यांना इतर गोष्टी तर सहजी देऊन जातो, मात्र कष्टसाध्य स्वच्छतेच्या सवयींचे अग्रक्रम त्याच त्वरेने हस्तांतरित होताना दिसत नाहीत.

मुंबईतही लोहमार्गाच्या कडेला झोपडपट्टी उभी राहिलेली आपल्याला दिसते. हे स्पष्टच असते की ते लोक गरीब असतात. ती झोपडीची जागाही त्यांच्या मालकीची नसते. सरकारी जागेवर झोपड्या उभ्या राहतात. मग झोपडीधारक समृद्ध होत जातो तसतसे, त्या त्या व्यक्तीच्या अग्रक्रमांनुरूप झोपड्यांचा विस्तार होत जातो. काही झोपड्या दुमजली होतात. झोपड्यांवर टी.व्ही.च्या अँटेना दिसू लागतात. झोपड्यांत फ्रीज येतात. झोपडीधारकांपैकी प्रत्येकाच्या हातात मोबाइल दिसू लागतात. मात्र त्यांच्या झोपड्यांत शौचकूप तयार होताना दिसत नाहीत. ज्या गरजा पुरवण्याचा भार सहजी इतरांवर ढकलून देता येतो, त्यांवर ते झोपडीधारक स्वकमाई खर्च करू इच्छित नाहीत. शौचकूपास प्राधान्य देत नाहीत. इथे अशा झोपडीधारकास आपण स्वार्थी म्हणू शकतो. मात्र त्यांच्या ह्या स्वार्थीपणाचा त्रास समाजास आणि त्याच समाजात ते स्वतःही राहत असल्यामुळे त्यांनाही होतोच होतो. त्यामुळे केवळ स्वतःस सोयीचा अग्रक्रम आणि सर्व समाजाच्या हितास सोयीचा अग्रक्रम असे दोन अग्रक्रम उद्भवताना दिसतात. व्यक्तीने समष्टीच्या सोयीनुसार आपले अग्रक्रम न बदलल्यास शहरे बकाल होतात. त्यामुळे व्यक्तीने

समष्टीच्या सोयीनुसार आपले अग्रक्रम ठरवणे हे आधुनिक समाजात निर्माण झालेले नवे नीतिमूल्य आहे.

अपि क्रियार्थं सुलभं समित्कुशं जलान्यपि स्नानविधिक्षमाणि ते।
अपि स्वशक्त्या तपसि प्रवर्तसे शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्॥
कुमारसम्भवम् - ५.३३

तपश्चर्येत काही लोक केवळ फळेच खातात. काही तर निव्वळ पाने खाऊनच जगतात. मात्र तपःसाधनेदरम्यान पानेही खाईनाशी झालेल्या 'अपर्णा' पार्वतीस शिव म्हणतात, ''तुला यज्ञाकरता समिधा आणि शय्येकरता कुश (दर्भ, गवताच्या काड्या) मिळतात ना? स्नानविधीस योग्य असे पाणी तुला मिळते ना? तू स्वबळावरच तपस्या करते आहेस ना? तर मग, कुठल्याही धर्मकृत्यासाठीचे आद्य उपकरण म्हणजे शरीरच असते (त्याची नीट काळजी घे)!''

कुमारसंभव ह्या महाकाव्यात प्राधान्यक्रमाची चर्चा करताना कविकुलगुरू महाकवी कालिदासाने वरील शिवसंदेश सांगितलेला आहे. त्याचा मथितार्थ असा की, कुठलेही धर्मकृत्य साध्य करण्यासाठी सर्वप्रथम शरीर स्वस्थ असणे आवश्यक असते. त्याला अग्रक्रम दिला पाहिजे. प्राधान्य दिले पाहिजे. स्वतःच्या प्राधान्यांना समष्टीच्या गरजांनुरूप मुरड घातली पाहिजे. कुमारसंभवात पार्वतीचे स्वतःचे प्राधान्य शिवप्राप्तीचे असते. शिवांना मात्र पार्वतीचे 'अपर्णा' पण मानवताना दिसत नाही. पार्वतीचे क्षेमकुशल साधावे म्हणून, ते तिला 'शरीरं आद्यं खलु धर्मसाधनम्' हे सांगण्यास अग्रक्रम देतात.

भारतीय अष्टांगयोगसाधनेत यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ह्या आठ पायऱ्यानी उद्दिष्टप्राप्त्यर्थ एकाग्रता साधण्यास अग्रक्रम दिलेला आहे. ह्याबाबतचा तपशील 'दिशा'च्या ऑगस्ट-२०१४ च्या अंकातील 'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' ह्या लेखात वाचता येऊ शकेल.

आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनी आपल्या देशाची प्राधान्ये ठरवली. तत्कालीन दोन जागतिक महाशक्तींशी असंलग्नता (नॉन-अलाइनमेंट) राखण्याचे परराष्ट्रधोरण स्वीकारले. लोखंड, पोलाद, सिमेंट आदी पायाभूत सुविधांकरता आवश्यक कच्चा माल देशातच उत्पन्न व्हावा ह्याला प्राधान्य दिले गेले. भाक्रानांगल, हिराकूड ह्यांसारखी मोठमोठी धरणे बांधून जलविद्युतनिर्मिती, तसेच शेतीसिंचनास प्राधान्य दिले गेले. अन्नधान्य स्वयंपूर्णता गाठण्याकरता 'हरितक्रांती'ची हाक दिली गेली. अमूल प्रकल्पाच्या निमित्ताने मग 'श्वेतक्रांती' घडून आली. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण, गरिबी-निवारण इत्यादी गोष्टींना त्यांनी अग्रक्रम दिला. राजीव गांधी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी आधुनिकीकरणास अपार महत्त्व दिले. पीपल्स पी.सी. नावाने व्यक्तिगत संगणक निर्माण करण्यास प्राधान्य दिले. नरसिंहरावांच्या कारकिर्दीत खुल्या अर्थव्यवस्थेस अग्रक्रम दिला गेल्याने, दूरसंचार क्षेत्रात क्रांती घडून आली. अटलबिहारींनी अणुस्फोट घडविण्यास प्राधान्य देऊन देशास अणुप्रगत बनविले. मनमोहनसिंग पंतप्रधान झाल्यावर अन्नसुरक्षा, ऊर्जासुरक्षा, रोजगार-हमी इत्यादी महत्त्वाच्या विषयांना अग्रक्रम मिळाला. आता नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर स्वच्छता, भ्रष्टाचारमुक्ती, सुलभ कायदेप्रणाली आणि सरकारबद्दल जनसामान्यांना विश्वास वाटावा, अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी, सुशासन देण्यास अग्रक्रम मिळालेला आहे. अशा अग्रक्रमांनी देश घडत जातो.

व्यक्तीही अशाच अग्रक्रमांनी घडत जात असतात. फुटबॉलसारख्या मैदानी खेळात रुची आणि गती असणारी मुले भविष्यात खेळाडू होतात. अग्रक्रमाने नृत्यकौशल्ये शिकणारी मुले, भविष्यात कुशल नर्तक होतात. बालपणातही किचकट गणितीय कोडी सोडवणारी मुले,

---

कुणाला मदत करत असताना त्याच्या डोळ्यांत बघू नका. कारण त्याचे झुकलेले डोळे तुमच्या मनात गर्व निर्माण करू शकतात.

पुढे जयंत नारळीकरांसारखी थोर गणितज्ञ होतात. माणसा-माणसांतील परस्परसंबंधांची वीण सहज समजून घेणारी मुले, मोठेपणी नरेंद्र मोदींसारखे नेते होतात. शाळा सुटली तरी चालेल, पण क्रिकेट सुटता कामा नये असा विचार करणारी मुले, पुढे सचिन तेंडुलकरसारखे मोठे क्रिकेटपटू होऊ शकतात. मुलातील उपजत गुण, वृत्ती, आणि कल जाणून घेऊन; तदनुषंगिक संधीच त्याला मिळू शकल्या, तसेच अग्रक्रम समाजाने सांभाळले; तर सोनिया सुगंधू येईल. नैसर्गिक कल व उपलब्ध संधीचा पुरेपूर वापर होऊ शकेल. त्या त्या व्यक्तींच्या जीवनात आणि समष्टीसही अपार समाधानाचा तो योग असेल. म्हणूनच, एरव्हीही आपापल्या अग्रक्रमांची निवड, स्वभावसुसंगत करणे उचित ठरेल.

संगीताची आवड असलेल्या मुलास गणिताच्या परीक्षांना बसवल्यास, पालक त्याच्या सांगीतिक रुचीचा ऱ्हाडस घडवत असतात. अशा परिस्थितीत त्यांनी मुलास उत्तम संगीततज्ञाकडे संगीत शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यास अग्रक्रम द्यावा. शाळेत वक्तृत्वस्पर्धा गाजवणाऱ्या, नाटकांत बक्षिसे मिळवणाऱ्या मुलास, शिष्यवृत्ती परीक्षेस बसविण्याची बळजोरी न करता, त्याच्या कलागुणांना उचित वाव देणाऱ्या पालकांना; आपला पाल्य रंगमंचकलाविशारद (मास्टर ऑफ थिएटर आर्टस्) होऊन, एका विख्यात कलाशिक्षणसंस्थेचा (अ‍ॅकॅडमीचा) संचालक होताना पाहता आल्याचे उदाहरण मला माहीत आहे.

मात्र अंतिमतः 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' ह्या उक्तीतले तथ्य काही नाकारता येत नाही. प्राधान्य कुठलेही असू दे, केवळ निष्क्रिय राहिल्यास ते कुचकामीच ठरेल.

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविश्यन्ति मुखे मृगाः॥

म्हणजे

केल्याने होतसे कार्य, इच्छेने फक्त, न होई ते।
कधीही सुप्त सिंहाच्या, तोंडी न प्रवेशती पशू॥

आपोआप उपजीविका साधत नाही. ती उद्यमानेच साधत असते. तशी ती साधत असतानाही, व्यक्तीने समष्टीच्या सोयीनुसार आपले अग्रक्रम ठरवल्यास, संपूर्ण समाजाचीच उन्नती सहज साधली जाऊ शकते. म्हणून तसे करावे हेच योग्य ठरेल! मान्यवर, तुम्ही काय म्हणता?

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

(पृष्ठ क्र.७ वरून **कुची टनेल, व्हिएतनाम** )

तर सुमारे ३३ हजार अमेरिकन लोकांनी आपले प्राण गमावले. सरतेशेवटी १९७३ साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यानी युद्धबंदी जाहीर केली. तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. त्याची साक्ष कुची टनेल परिसर देत आहे. एके काळी घनदाट असलेले हे जंगल जवळजवळ नामशेष झाले होते. मागील चार दशकांत वनस्पतींची पुन्हा वाढ झाल्याने या जंगलाला मूळचे स्वरूप प्राप्त झाले आहे. अनेक वर्षे चाललेल्या या युद्धाने अमेरिकेने नेमके काय साधले हा प्रश्न मला सतावत राहिला.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १६**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ४९ वा (खुजावा) धरमपुरी : धामणोद**

धामणोद सोडल्यावर वाळूत चुकलो व अर्धा-पाऊण तास वाया गेला व लवकर निघाल्याचा होणारा फायदा निघून गेला. किनाऱ्याजवळून रस्ता नसल्याने हमरस्त्याने निघालो. चहा घेतला नव्हता म्हणून धर्यपुरी (मुख्य) आल्यावर चहा घेतला. (बिर्याणी मटण/चिकन फक्त २० रु. त दिली जाते.) दोन तास चालल्यावर चौकशी करून किनारा गाठला व ९ ते ११॥ दगडगोटयातून चाललो. मैय्याचा प्रवाह दुभागलेला/त्रिभागलेला दिसला, खोलीही खूप नव्हती आणि कोरड्या पात्रात दगडगोटयांचे साम्राज्य!

नावालाही सावली नाही, ऊन रणरणायला लागले. पायाखालच्या गोट्यांमुळे पावले / टाचा दुखायला लागल्या. वरच्या अंगाने चालावे तर अनंत मोटर पम्प व त्यांचे अनंत मोठमोठे पाइप आडवे येत. त्यातूनच वरून कुठूनतरी झिरपून खाली येणाऱ्या पाण्यामुळे चिखलपाणी अनेकवार ओलांडायला लागे. सावली नावालाही नाही. ११॥/१२ वाजता थकून कंटाळून गावाजवळ वर चढलो व सावली पाहून पारावर थकून भागून आसनस्थ झालो.

अशोक कुठे आश्रम दिसतो का म्हणून कुठे गेला ठाऊक नाही पण थोड्या वेळाने पाण्याचा पेला व पाठोपाठ चहा आला. नर्मदा जयंतीनिमित्त फार मोठा सप्ताह या गावात होत आहे त्याची तयारी गावकऱ्यांनी दाखविली. पांढरीशुभ्र वस्त्रे परिधान केलेल्या कुणा माताजींनी निमंत्रण दिले म्हणून वर गेलो तो शिरा मिळावा.

शुभ्रवस्त्रांकिता स्त्री म्हणजे एकतर गुळगुळीत दाढी केलेला रुपवान पुरुष होता किंवा तृतीयपंथी होता. आम्हांला २५/२५ रु. दक्षिणाही मिळावी. या माताजी मैय्यारूपात असतात व सर्वांना आपली मुले मानतात. परंतु आम्ही वयाने ज्येष्ठ असल्याने नमस्कार (पायाला हात लावून) केला तो मात्र स्वीकारला नाही.



या गावानंतर हमरस्त्याने जावे लागते, एक दीड किलोमीटर चाळल्यावर हम रस्ता आला. इथून खलघाट ५ कि. मी. होता. खलघाट गाठताना वाटेत उंटांचा छोटा ताण्डा मागून पुढे गेला. उंटावर बोजा होत्या. खोळी होत्या. त्यांत मुले, बकऱ्या होत्या. सर्व सामान उंटावर लादलेले होते. रंगीबेरंगी चटकदार कपडे परिधान केलेल्या राजस्थानी स्त्रियांसह तो तांडा पाहणे एक मौज होती.

खलघाट गाठेपर्यंत २॥/३ व्हायला आले होते. आज नदीपात्रात मला दोन बाण व पिंडीसाठी एक गोल गोटा मिळाला. खलघाटला एका खानावळीत व्यवस्थित जेवलो व धामणोदकडे निघालो. नदीकिनारी भयंकर ऊन खाल्ले होते त्याचीच पुनरवृत्ती इंदौर हायवेवर २/३ तास

चालतोय, ऊन सोसतोय तरी ५ कि.मी. मधले ३ कि.मी. अजून कापायचे आहेत! असा प्रवास असेल तर परिक्रमा/परिभ्रमण फार म्हणजे फारच कठीण होईल याची मला धास्ती वाटायला लागली.

हायवेच्या दुतर्फा शेती आहे, पण झाडी शून्य. शेतावर असलेली झाडे आम्हांला शून्य. हायवेला झाडेच नाहीत. हायवेने फक्त गाड्याच चालतील अशीच मनोवृत्ती त्यात दिसते.

गाव गाठले तेव्हा पूर्ण शक्तिपात झालेला. अशोकने बालाजी मंदिरात राहण्याची व्यवस्था शोधली तोवर मी स्थानिक लोहाराकडून काठीला संरक्षक बूड बसवून घेतले (Bottom rings).



बालाजी मंदिर सुशोभित गाभारे, देखाण्या व अलंकृत मूर्ती, मोठी धर्मशाळा म्हणजे फार मोठा हॉल मागे, तिथे आम्ही उतरलो, मंडपवाल्या मालकांनी गाद्या पाठविल्या. चहा दिला व मंदिरात उत्तम खिचडी वाढली.

मंडप दुकान मंदिराशेजारी. त्याने स्वतःहून तीन गाद्या व तीन ब्लँकेटस् पुरविली. रात्री चहाही दिला. रात्री उद्याची तयारी, त्यातही सहभागी होता. मंदिराची मागची बाजू म्हणजे हजार-एक माणसे सहज मावतील असा मोठा हॉल आहे. त्यात पंखे, दिवे, स्वच्छतागृह-सर्व काही आहे.

धरमपुरीपासून ५ कि.मी. अंतरावर एक आदिवासी हताश होऊन रस्त्याच्या कडेला बसला होता. धरमपुरीचे गायवासरू खलघाटहून परत धरमपुरीला घेऊन तो चालला होता. गाईने असहकार पुकारला व रानोमाळ धावू लागली. याने कसेबसे पकडून पाय एकत्र बांधून मायलेकीला एकमेकांशी जखडून ठेवले होते. बाबा, काहीतरी करा, या गायवासराला परत जायचे नाही !

नर्मदामाय समजून मी प्रेमाने गाईला समजाविले, पण परिणाम शून्य! गाईपासून वासरू वेगळे करून त्याला नेले की गाय आपोआप येईल, पण वासरू एक इंचही सरकले नाही. माय मात्र मागे मागे जात निषेध नोंदवीत होती. अखेरीस दोघांना वेगवेगळ्या झाडांना बांधले. पुढे काय झाले ठाऊक नाही! तोसुद्धा मदतीचे पैसे देत होता.

**दिवस ५० वा धामणोद - महेश्वर - लडवी मु. नागमंदिर**



रात्रभर धामणोद मंदिरातील मागच्या बाजूला संक्रांत पर्व भोजनाची मोठी तयारी सुरू होती. सकाळी उठलो तेव्हा भोजन तयार होते.

रात्रभर वीज होती, परंतु सकाळी मात्र नव्हती. अंधारातच तयारी केली. काल दिवसभरात स्नान झाले नाही. संध्याकाळी धामणोद गाठले तेव्हा खूपच थकलो होतो. त्यातून पाहिले तर पाणी थंड फार वाटले. कपडेही खळखळायचे होते, पण तेही केले नाही. मैय्यापूजन मात्र केले होते. आजवर काल प्रथमच स्नानाशिवाय राहिलो. मला बरे वाटत नव्हते.

आज मात्र सकाळी थंडगार पाण्याने स्नान केले.

(पृष्ठ क्र. १७ वर)

पात्रता नाही म्हणून आपण परस्परांना भेटणे बंद केले तर आपल्यापैकी बऱ्याच जणांना अज्ञातवासात जावे लागेल. -रवींद्रनाथ टागोर

# कंबोडिया - एक भयानक सत्य
## (भाग २)

*कंबोडिया या देशाची माहिति सांगणारा लेख - संपादक*

किलिंग फील्ड बघून मी S - २१ कडे निघालो. S - २१ हा तुरुंग नसून ती एक शाळा होती. ही सरकारी शाळा त्या काळातली सर्वांत मोठी शाळा होती. ३ मोठे ब्लॉक व प्रत्येक ब्लॉकमध्ये ३ मजले. प्रत्येक मजल्यावर ५ वर्गखोल्या आहेत. पहिल्या मजल्यावरच्या वर्गखोल्यांमध्ये साधारण ६० - ७० लोकांना दिवसभर डांबून ठेवले जायचे. दिवसभरात सर्व कैद्यांना फक्त मारहाणच केली जायची. या वर्गखोल्या जशाच्या तशा ठेवण्यात आल्या असून आजही त्या खोल्यांमध्ये भीषण अत्याचाराच्या खुणा आढळून येतात. या तुरुंगात ४ वर्षांत ३०,००० लोकांना डांबून ठेवल्याची नोंद आहे. एकदा S -२१ मध्ये रवानगी झाली तर मृत्यू अटळच होता. या तुरुंगात रवानगी होऊनही ७ जण केवळ त्यांचे नशीब बलवत्तर म्हणून वाचले. या ७ पैकी २ जणांना बघण्याचा योग मला आला. योगायोगाने त्याच दिवशी तेथे History Channel तर्फे चित्रीकरण सुरू असल्याने वाचलेल्यांपैकी २ जण तेथे आले होते. या तुरुंगाची ओळख क्रूर अत्याचार होणारी जागा म्हणूनच करून दिली जाते. वर्गातील फळ्यांचा उपयोग कैद्यांची नावे लिहिण्यासाठी केला गेला होता. पुन्हा एकदा मी शिक्षक असल्याने भावी नागरिक घडवणारी जागा म्हणजे शाळा नागरिकांना संपवण्यासाठी वापरली गेली ते बघून पुन्हा हताश झालो. सकाळपासून किलिंग फील्ड व S - २१ तुरुंग बघितल्यावर एक प्रश्न सतत मनात येत होता. तो म्हणजे, त्या ४ वर्षांत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर कंबोडियामध्ये सुरू असलेल्या विचित्र गोष्टींचे काय पडसाद उमटत होते?

या प्रश्नाचे उत्तर S-२१ मधल्या नंबर २ च्या ब्लॉकमध्ये मिळाले. हा ब्लॉक म्हणजे त्या काळातील छायाचित्रांचा संग्रह आहे. लेखाच्या पहिल्या भागात सांगितल्याप्रमाणे पोल पॉटने कंबोडियाच्या सर्व सीमा बंद करून टाकल्या होत्या. त्यामुळे बाहेरच्या जगाशी कंबोडियाचा संपर्क पूर्णपणे तुटला होता. कोणीही देशाबाहेर जाऊ शकत नव्हता. अशा पद्धतीने देश चालवणे अवघड जाईल हे पोल पॉटच्या लक्षात आले. त्यामुळे त्याने स्वीडनच्या Communist party शी संपर्क साधून त्यांच्या नेत्याला कंबोडियामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. १९७८ च्या ऑगस्टमध्ये आलेला गर्नर बर्ग्स्रोम हा त्या ४ वर्षांतला पहिला माणूस होता जो कंबोडियामध्ये बाहेरच्या देशातून आला होता. तो दोन दिवस नोम पेनमध्ये थांबला व त्याच्यासाठी खास मेजवानीचा बेत खमेर रूजच्या अधिकाऱ्यांनी आखला होता. त्याला सर्वत्र शेतात काम करणारे लोक दाखवले गेले. कंबोडियाची एका शेतीप्रधान समाजाकडे वाटचाल सुरू असून सर्व जण आनंदी आहेत असे त्याला खमेर रूजकडून भासवण्यात आले. या नवीन समाजबांधणीच्या प्रयोगात थोडेफार विरोध करणारे असतीलच, त्यांची हत्या करण्यात आली; परंतु ती संख्या थोडीशीच होती व कंबोडियामध्ये सर्व काही आलबेल आहे अशी त्याची खोटी समजूत काढण्यात आली. युरोपमध्ये वापरत येऊन बर्गस्रोमने पोल पॉट व खमेर रूजचे कौतुक केले व पोल पॉटचे स्थान युनोमध्ये कंबोडियाचा नेता म्हणून पक्के झाले. हे सर्व वाचल्यावर मी राग येण्यापलीकडच्या अवस्थेमध्ये जाऊन पोहोचलो. अक्षरशा जड पावलाने S-२१ च्या बाहेर येऊन टॅक्सीने माझ्या

---

यश मिळवण्यासाठी कोणत्या मार्गाने जावे, हे मी सांगू शकणार नाही. पण स्वतःला ओळखून स्वतःला, स्वतःसाठी, स्वतःकडून नेमके काय हवे आहे, हे शोधणे म्हणजेच यशाच्या जवळ जाणे होय. -विश्वनाथन आनंद

हॉटेलवर पोहोचलो. रात्रीच्या जेवणासाठी भारतीय रेस्तोरांतचा शोध घेतला व तेथे गेलो. पटकन जेवण आटोपून घ्यायचे व पोल पॉटचा शेवट कसा झाला याचे वाचन करायचे हा विचार करून पटापट जेवत असताना बाजूच्या टेबलवर दोन भारतीयांना बघून स्मितहास्य केले. त्यांनीही प्रतिसाद दिला व आमच्यात चर्चा सुरू झाली. थोड्याच वेळात ते पुण्याचे आहेत हे कळल्यावर इंग्लिशमध्ये सुरू झालेले संभाषण पटकन हिंदीवरून मराठीमध्ये आले. आणि थोड्या वेळासाठी मी स्वतःला खूपच नशीबवान समजलो. कारण ज्यांची-माझी ओळख झाली ते श्री. भागवत हे कंबोडियामध्ये १० वर्षांपासून एका NGO तर्फे अहिंसाप्रसाराचे काम करतात हे कळले. हे ऐकून मला आनंदच झाला, पण नंतर माझी कंबोडियाच्या इतिहासातील गोडी जाणून त्यांनी खमेर रूजमध्ये काम केलेल्या सैनिकाची मुलाखत घ्यायला आवडेल का असे विचारून माझा आनंद आणखीनच द्विगुणित केला. मला तर हे हवेच होते. मी लगेच हो म्हणालो. दुसऱ्या दिवशी सकाळी ११:०० वाजता भेटायचे असे ठरवले. रात्रभर माझ्या मनात त्या व्यक्तीला काय विचारावे अशा अनेक प्रश्नांनी गोंधळ घातला होता. त्या उत्सुकतेपोटी मला नीट झोपच लागली नाही.

सकाळी ११:०० वाजता ठरलेल्या जागी आम्ही भेटलो. ते गृहस्थ तसे वयस्करच होते. श्री. मेंग उन हे त्यांचे नाव. श्री भागवत हे आता अस्सल कंबोडियन बोलतात. ते व त्यांचा सहकारी श्री. मनोज यांनी दुभाष्याची भूमिका पार पडली.

मेंग उन जरी खमेर रूजमध्ये काम करत होते तरी त्यांच्याकडे कधीच कोणाला ठार मारायचे काम आले नव्हते. केवळ बळजबरी म्हणून त्यांना खमेर रूजमध्ये सामील व्हावे लागले. पोल पॉट तसा त्यांच्या भागावर खूश होता कारण त्या काळात त्यांचे गाव प्रामुख्याने मासे मिळण्याचे ठिकाण असल्याने त्या गावातले खूपच कमी लोक मारले गेले होते. परंतु त्यांच्यासमोर होणाऱ्या हत्या ते कधीच रोखू शकले नाहीत. केवळ दुःख व्यक्त करण्यापलीकडे त्यांच्या हातात काहीच नव्हते. ते स्वतः शिक्षित होते परंतु ४ वर्षे त्यांनी आपली ओळख लपवून ठेवली. त्यांनी आपले बायबलदेखील १ वर्ष लपवून ठेवले. परंतु जेव्हा खमेर रूज सैनिकांना संशय आला तेव्हा मेंग उन यांनी सर्वप्रथम ते बायबल फाडून फेकून दिले. त्यांची २ वेळेस चौकशीही झाली, परंतु त्यांच्या गावातील खमेर रूजचा अधिकारी थोडा माणुसकी जपणारा असल्याने ते थोडक्यात बचावले. दुसऱ्या चौकशी दरम्यान त्यांना आपला मृत्यू अटळ आहे असेच वाटले होते. १९७७ नंतर प्रत्येक दिवस आपला शेवटचा म्हणून ते जगले. आपली खरी ओळख खमेर रूजला कधीही कळेल याची खातरी त्यांना झाली होती. या दरम्यान त्यांनी आपल्या कुटुंबाला याची जाणीव करून दिली होती. हा प्रसंग ऐकताना नकळत माझ्या अंगावर शहारे आले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे धर्मग्रंथ जीव घेऊ शकतो हे मानणे मला जरा जडच गेले.

**खमेर रूजचा अस्त :**

डिसेंबर १९७८ मध्ये पोल पॉटने आपला पारंपरिक शेजारी शत्रू व्हिएतनामला विनाकारण डिवचण्यास सुरुवात केली. त्याची ही सर्वांत मोठी चूक होती. परंतु ही चूक कंबोडियातील उरलेल्या जनतेच्या पथ्यावर पडली. खऱ्या अर्थाने पोल पॉटच्या साम्राजाचा अस्त व्हिएतनाममुळेच झाला असे म्हणावे लागेल. डिवचल्यामुळे चिडलेल्या बलाढ्य व्हिएतनामच्या सैन्याने कंबोडियावर आक्रमण केले. व्हिएतनामच्या सशस्त्र व शक्तिशाली सैन्यासमोर खमेर रूजचा निभाव लागलाच नाही. १५ ते २० दिवसांत खमेर रूज सैन्यात फूट पडली. काही अधिकारी व्हिएतनामी सैन्याला सामील झाले व पोल पॉटसह त्याचे काही निष्ठावंत थायलंड सीमेजवळच्या जंगलात पळून गेले. अशा प्रकारे ७ जानेवारी १९७९ ला व्हिएतनामचे सैन्य नोम पेन शहरात

घुसले व कंबोडियाची भीषण अवस्था जगासमोर आणली गेली. S -२१ मधील सडलेल्या मृतदेहांचे व्हिएतनामी सैनिकांनी फोटो काढून प्रसिद्ध केले. आजही हे फोटो S -२१ मध्ये आढळून येतात. हळूहळू पुढच्या १- २ वर्षांत संपूर्ण जगाला याची ओळख होऊ लागली. बळजबरीने खेडेगावात पाठवले गेलेले लोक शहरात परत यायला सुरुवात झाली. आता कंबोडिया पूर्णपणे व्हिएतनामच्या आधिपत्याखाली होता. खमेर रूजकडून फुटीर झालेल्या काही अधिकाऱ्यांकडेच देशाची सूत्रे सोपवण्यात आली. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. पोल पॉटला कधीच शिक्षा झाली नाही .

UNO च्या अंतरराष्ट्रीय कोर्टात पोल पॉटच्या विरोधात कंबोडिया सरकारने ज्यात खमेर रूजचेच अधिकारी होते- कधीच सशक्त पुरावे दिले नाहीत . १९९८ पर्यंत पोल पॉट थायलंडजवळच्या जंगलात आपली बायको, एक मुलगी व त्याच्या काही निष्ठावंतांसोबत राहत होता. १९९० पर्यंत त्याना पश्चिम कंबोडियाच्या जंगलात लपून त्याच्या कारवाया सुरू होत्या. नव्या कंबोडियाच्या सरकारने कधीच त्याच्यावर खटला भरला नाही. त्यामुळे हा क्रूरकर्मा आपले जीवन व्यवस्थित जगत होता. १५ एप्रिल १९९८ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी त्याचा हृदयविकाराने झोपेतच मृत्यू झाला. आज त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या ४ अधिकाऱ्यांवर नावापुरता खटला चालू असून आता फक्त दोषारोपाचा खेळ चालू आहे.

हे सर्व कळल्यावर माझ्या मनातून दोन गोष्टींचा विचार काही केल्या जातच नव्हता. एक म्हणजे लहानपणी शाळेत तसेच घरी मोठ्यांकडून शिकवली गेलेली 'जैसी करनी वैसी भरनी' ही म्हण ती पोल पॉटच्या बाबतीत पूर्णपणे खोटी ठरली. त्याला त्याच्या कर्माची फळे मुळीच भोगावी लागली नाहीत. त्याला साधे तुरुंगात पण राहावे लागले नाही. १९९० पासून त्याला त्याच्या राहत्या घरात नजरकैदेत ठेवण्यात आले. यापेक्षा कंबोडियाचे दुर्दैव ते कुठले !

दुसरे म्हणजे, पोल पॉटचे साम्राज्य - जे केवळ हिंसेच्या बळावर मिळवले गेले होते ते फक्त ४ च वर्षे टिकले, यावरून केवळ हिंसेच्या बळावर मिळालेली सत्ता किंवा यश हे कधीच कायमस्वरूपी नसते ह्याची मला प्रखर जाणीव झाली. अर्थपूर्ण यश मिळवायचे असेल तर अहिंसा हा महत्त्वाचा मार्ग असतो व हिंसेचा मार्ग चुकीचाच असतो असे मला कंबोडियाचा भयानक इतिहास समजल्यावर आणखी प्रकर्षाने जाणवायला लागले. आणि नकळतच भारताला अहिंसेच्या मार्गाने मिळालेल्या स्वातंत्र्याचे महत्त्व पटू लगले. आपल्या प्रगल्भ लोकशाही देशाचे गुपित निश्चितच गांधीजींच्या अहिंसा मार्गात आहे याची मला प्रकर्षाने जाणीव व्हायला लागली. एका सशक्त आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व किती महत्त्वाची भूमिका बजावू शकते याचाही प्रत्यय मला आला. त्या काळात दुर्दैवाने कंबोडियामध्ये सशक्त नेतृत्वाचा अभाव असल्याने कंबोडिया अमानवीय अशा काळाकडे लोटला गेला असा माझा निष्कर्ष होता. शेवटी 'दे दी हमे आझादी बिन खड्ग बिना ढाल, साबरमती के संत तूने कार दिया कमाल' हे बोल नकळत माझ्या ओठांवर आले व कंबोडियाच्या अद्भुत भेटीमुळे एका नव्या प्रेरणेने मी अहिंसा या विषयाकडे बघण्यास सज्ज झालो..

**संदीप कुलकर्णी**

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***

***०२२-२५४२ ६२७०***

# Robot - मानवी उत्क्रांतीची चौथी क्रांती २०१५ पासूनची

*मानवी जीवनात Robot ची महती सांगणारा लेख - संपादक*

या वर्षी जर्मनीमध्ये व्यापारी परिषदेत जे मंच ठेवले होते त्यामध्ये जर्मनीने 'रोबोट' मॅच हा वैशिष्ट्यपूर्ण मंच मांडला होता. आताच्या २०१५ पुढच्या कालाची ही चौथी क्रांती आहे ह्याचे दर्शन घडवले होते. मानवी जीवनातील ज्या पहिल्या तीन क्रांत्या झाल्या त्यांमध्ये मानवी जीवनात कौटुंबिक जीवन, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक व तत्वज्ञानात्मक या सर्व स्तरांवर जे पूर्णतः बदल होत गेले त्यांचा आढावा घेऊन त्या मंथनातून 'रोबोट' क्रांतीचे वैशिष्ट्य दाखवणारा हा आलेख मांडला आहे.

**पहिली क्रांती** - Agricultural Revolution - शेतीप्रधान क्रांती- सामान्यतः इ.स.१७०० व १८०० या वर्षापासून युरोप व उत्तर अमेरिकेत शेतीविषयक बदल होत गेले. शेतीतील उत्पन्न वाढवण्यासाठी शास्त्रीय पद्धती वापरल्या जाऊ लागल्या. शेतीसाठी लागणारे पाणी साठवणे, शेती यंत्रांच्या साहाय्याने नांगरणे व वाफारणे यांमध्ये यंत्राचा उपयोग होऊ लागला व 'यंत्र' हे उत्पादनाचे महत्त्वाचे अंग ठरले बी-बियाणे जास्त जोमदार करणे याकडे लक्ष दिले जाऊ लागले.

**दुसरी क्रांती** - Industrial Revolution - औद्योगिक क्रांती : 'मशीन' - यांत्रिकीकरणाचा झपाटा मोठा होता. वाफेच्या इंजिनचा शोध लागला. इलेक्ट्रिसिटीचा शोध लागला. त्याचा परिणाम होऊन पुढे Factories (कारखाने) निर्माण झाल्या. कापूस बनवण्याच्या पद्धती विस्तारल्या. कापसाचे उत्पन्न वाढू लागले. त्यातून कापडाच्या गिरण्या (Mills) निर्माण झाल्या. हा माल पाठवण्यासाठी वाहतुकीला महत्त्व आले. त्यातून पुढे रेल्वे, जलवाहतूक, कालवे, पूल बांधणे हे विकसित होऊ लागले. बोटीचा शोध लागला व दुसऱ्या देशांत अन्नधान्य, कपडे इ. पाठवण्याचा उद्योग वाढीस लागला.

कामगार हा एक निराळाच वर्ग तयार झाला. फॅक्टरीजचे मालक हा एक भांडवलदार वर्ग तयार झाला. राजेशाही, सरंजामशाही नष्ट झाली. कामगारवर्ग व भांडवलदारवर्ग यांचे संबंध निराळ्याच स्तरावर गेले. कामगारांची पिळवणूक होऊ लागली. त्यातून कार्ल मार्क्सने Capital (कॅपिटल) ग्रंथ लिहून तात्त्विक विचार मंथन केले व समाजवादा (Socialism) ची दिशा दाखवली. तात्त्विक बैठक तयार झाली. राष्ट्राराष्ट्रांत वितुष्ट, चढाओढी सुरू झाल्या आणि पुढे पहिले व दुसरे महायुद्ध झाले. यांतून पुढे UNO संस्था समन्वयासाठी निर्माण झाली.

वैज्ञानिक संशोधन व क्रांतीचा झपाटा इतका मोठा की Nasa सारखी सूर्यमालेचा वेध घेण्यारी संस्था निर्माण झाली.

जीवन - कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आमूलाग्र बदलत चालले; बदलत आहे.

**तिसरी क्रांती** - Computer Revelation - Mobile, Lap-Top, On-Line, Google...

शास्त्रीय प्रगतीचा झपाटा इतका वाढला की त्यातून Electronic तंत्रविद्या विकसित झाली. T.V., Mobile, Lap Tap आलेच शिवाय Micro-chips, Internet, Seach Engin यांच्या साहाय्याने यंत्रांने आपला वेग आला. वैद्यकशास्त्राने Computer चा उपयोग करून रोगनिदान, रोग उपचारासाठी MRI इत्यादी यंत्रे आणली. On line ने, गुगलच्या प्रगत ज्ञानाने, भिंतीशिवाय शाळा-कॉलेजे, शिक्षकाशिवाय शिक्षित करण्याचे तंत्रज्ञान आले

कोणतेही अडथळे नसलेली साधी वाट कशाचेही नेतृत्व करू शकत नाही.

सॅटेलाईटच्या शोधाने अंतराळचा शोध सुरू झाला. मंगळावर माणूस पोहोचला. वैद्यकशास्त्रात जीनचा शोधाने रक्ताच्या थेंबातून मनुष्य निर्माण करणे (क्लोनिंग) शक्य झाले Brain च्या अभ्यासातून मानसशास्त्र, मानसोपचारशास्त्र झपाट्याने बदलत आहे.

**चौथी क्रांती - Robat**

'रोबट' म्हणजे Automatic Machine (यंत्र) चालवण्यासाठी माणसाची जरुरी होती. परंतु असे मशीन बनवण्यात आले आहे की माणसाची जरुरी नाही. मनुष्य जी कामे करतो ती सर्व कामे झपाट्याने व अचूकपणे रोबोट मशीन बनवणे शक्य झाले आहे. रोबोट काय काम करू शकतो?

१) गेम खेळू शकतो.
२) बुद्धिबळ खेळू शकतो.
३) पायलट शिवाय विमान चालवू शकतो, मोटारी चालवू शकतो.
४) रोबोटचा उपयोग करून वैद्यकीय ऑपरेशन करू शकतो.
५) रोबोटच्या साहाय्याने Genetherapy व Neno-Therapy प्रगत होत आहे.

जी राष्ट्रे या Robot वर प्रभुत्व गाजवतील तीच राष्ट्रे जगावर सत्ता चालवतील. आपल्या शिक्षणपद्धतीतून असे कुशल तंत्रज्ञ निर्माण करता आले पाहिजेत असे शिक्षणशाखांना-शिक्षणसंस्थांना I.I.T. व T.I.F.R. सारख्या संस्थांचे जाळे पसरविता आले पाहिजे.

सर्व मानवी जीवन प्रभावित करणाच्या या चारही क्रांत्यांचा अभ्यास करणे व त्यातून राष्ट्रीय जीवनाला दिशा देणे हे महत्त्वाचे आहे.

**ह. श्री. परांजपे**
ग्रंथपाल (निवृत्त), बेडेकर कॉलेज, ठाणे.
बी-२०४, मारुती दर्शन सोसायटी,
आदिशंकराचार्य मार्ग,
मेन गेटसमोर, पवई, मुंबई - ७८.

(पृष्ठ क्र.१२ वरून **नर्मदा परिक्रमा** )

मंदिराने निघण्यापूर्वी चहा दिला. बाहेर पडलो. पोहे खाल्ले. इथे स्वच्छतेबाबत उदासीनता असते. परिक्रमेत नसतो तर अशा ठिकाणी खचितच खाल्ले नसते.

गेले दोन दिवस लवकरच निघतो. नंतर उन्हामुळे फार त्रास होतो म्हणून सकाळी होईल तेवढे अधिक अंतर कापता यावे हा हेतू. इंदौर हायवे आता नाही, हा दुसराच बडवाहकडे जाणारा डांबरी रस्ता आहे. रस्त्याला अगदीच बोडकेपणा नाही. मध्येमध्ये सावलीत थांबता येते. दुतर्फा शेती आहे.

दोन-एक तास चालल्यावर पार पाहून टेकलो तर समोरच्या घरातून निमंत्रण आले. चहा दिला. त्या माताजी धार्मिक होत्या. मैय्याकृपेने आमचे फार छान चालले आहे म्हणाल्या आणि निघताना आम्हांला चार मोठे पौष्टिक लाडू बरोबर दिले खाण्यासाठी. नर्मदे ऽऽ हर ! वाटेत आणि एका ठिकाणी ओसरीवर शेंगा खात बसलो असता असाच चहा मिळाला.

उन्हाचा त्रास कालपेक्षा कमी झाला. एक वाजता महेश्वर गाठले. घाटावर स्नान, कपडे केले. नंतर बाँके बिहारी याचा भोजनप्रसाद (रु.३५/-) ग्रहण केला. भोजन अत्यंत रुचकर अतिशय अगत्याने व वारंवार आग्रहापूर्वक वाढले जात होते.

सॅक तिथे ठेवून राजवाडा इत्यादी पाहून आलो व ४॥ वाजता पुढे निघून ४ कि. मी. अंतरावरील लडवी येथील रस्त्यावरील नागमंदिर गाठले तेव्हा ५॥ वाजून अंधार पडायला लागला होता.

सॅकमुळे अंगरखा फाटायला आला, नवा घेतला. वसुधासाठी एक माहेश्वरी साडी घेतली.

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

सर्व गोष्टींना पुरून उरणारी एकच गोष्ट आहे. ती म्हणजे : कष्ट.. कष्ट.. आणि कष्ट.

# भारतीय नियोजन आयोग आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे अर्थ-राजकीय भवितव्य

*भारतीय नियोजन आयोग आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे अर्थ-राजकीय भवितव्य याबाबत लेखिकेने आपले विचार या लेखात मांडले आहेत - संपादक*

२०१४ साली भारतात पार पडलेल्या निवडणुका, त्यानंतर झालेले सत्तांतर आणि नव्या सरकारचे सत्तारूढ होणे या सर्वांचा परिणाम 'भारत' नावाच्या महाकाय देशाच्या सामाजिक, भू-राजकीय, सांस्कृतिक तसेच आर्थिक क्षेत्रावर होणे स्वाभाविक आहे. सामाजिक समानतेवर अधिष्ठित आर्थिक विकास साधू इच्छिणाऱ्या काँग्रेस पक्षाची जवळपास अर्धशतकाहून जास्त काळ सुरू असणारी सत्तेची मक्तेदारी मोडीत काढून, 'नियोजनातून विकास', 'जलद सर्वसमावेशक विकास' या आर्थिक संज्ञा मागे पडून नव्या मनूच्या नव्या लाटेवर पूर्वसूरींनी घालून दिलेली चौकट आता मोडीत निघेल असे दिसते आहे. याच लाटेत १९५० साली देशात स्थापन झालेला नियोजन आयोग आणि त्याची आवश्यकता काळाच्या कसोटीवर तपासून बघण्याची गरज अर्थविचारवंत आणि प्रशासनिक यांना वाटू लागली आहे. विकासवाद आणि नियोजनवाद (Developmentalism vs. Planned Development) या दोन विचारसरणींमधील हा संघर्ष मार्क्सच्या द्वंद्वात्मक विकासप्रणालीला अनुसरूनच आहे असे म्हणावे लागेल. सत्ताबदलानंतर नव्या (Dialectics) सरकारच्या आर्थिक प्रवृत्ती आणि विकासाचा अजेंडा यांत नियोजन आयोगाचे भवितव्य काय हा कळीचा मुद्दा आहे.

मुळात नियोजन आयोग आणि योजनाबद्ध विकासाचे प्रतिमान आपण स्वीकारले सोव्हिएत रशियाकडून. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक विकासासाठी नेहरूंनी नियोजनाचा मार्ग अवलंबला आणि तेव्हापासून भारतीय अर्थव्यवस्थेला नियोजनबद्ध विकासाची शिस्त लावण्यात आली. या नेहरूवादी रचनेचे स्वागत देशाने केले आणि पंचवार्षिक योजनांचा उदय झाला. देशातील अर्थतज्ज्ञ, वित्तसल्लागार, सांख्यिकीतज्ज्ञ आणि प्रशासक यांची मोट बांधून या सर्वांच्या ज्ञानकौशल्याचा फायदा अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी होईल या प्रामाणिक हेतूने नियोजन आयोग नावारूपास आला. परंतु काळाच्या ओघात देशावर आलेल्या नैसर्गिक व राजकीय संकटांमुळे 'नियोजन अवकाश'- योजना सुटीचा काळदेखील देशाने अनुभवला. १९६६ ते १९६९ या काळात देशात झालेली हरितक्रांती, श्वेताक्रांती या सर्वांना नियोजन आयोगाने हातभार लावला. परंतु अर्थव्यवस्थेची स्थिती ही सातत्याने बदलत जाणारी असते. १९८० च्या दशकात आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेने जगभरात आर्थिक विकासाचे समीकरण बदलले आणि त्यास आपला देशही अपवाद नव्हता. ९० च्या दशकापूर्वी सार्वजनिक क्षेत्राला अवास्तव महत्त्व देऊन मिश्र अर्थव्यवस्था म्हणवून घेणाऱ्या भारतातही मुक्त बाजारपेठीय अर्थव्यवस्थेची चाहूल लागली. १९९१ च्या आर्थिक सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेचा एक भाग बनली आणि आर्थिक सुधारणांनंतरच्या २३ वर्षांत नियोजन आयोगाच्या आवश्यकतेबद्दल तर्कनिष्ठ विचारविनिमय करण्याची गरज निर्माण झाली आहे.

जागतिकीकरणानंतर आर्थिक सुधारणा, विकास या सर्वांचे संदर्भ बदलले असून जागतिक अर्थव्यवस्था व बाजाराधिष्ठित प्रक्रिया यांद्वारे अर्थव्यवस्थेचे संचालन होताना दिसते. अशा परिस्थितीत संपूर्ण लोकशाही असणाऱ्या मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप अगदी प्रारंभापासून राबवणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत सद्यःस्थितीत नियोजन आयोगाची भूमिका काय असावी हा कळीचा मुद्दा ठरतो.

पंचवार्षिक योजनाच्या प्रक्रियेकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहिले असता 'गरिबी हटाव', लोकसंख्या नियंत्रण यांसारख्या उद्दिष्टांना डोळ्यांसमोर ठेवून आर्थिक प्रक्रिया राबवणाऱ्या 'मायबाप' काँग्रेस सरकारांना दीर्घलक्ष्यी योजना आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी NDC - National Development Council अर्थात 'आर्थिक विकास परिषद' यांची गरज भासली असणार हे तर्कसुसंगत तसेच कालसुसंगत दिसते. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या लगेचच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या समस्या व त्यांचे स्वरूप आज पालटलेले दिसते. त्यामुळे नव्या प्रकारच्या जागतिकीकरणोत्तर समास्यांना उपाय शोधण्यासाठी जुन्या चौकटीतील नियोजनवादी उपाययोजना कशा उपयुक्त ठरतील?

या संदर्भात कार्ल मार्क्सच्या विधानांचा संदर्भ ध्यानात घेता, मार्क्सवादी विश्लेषणानुसार समाजातील सामाजिक - राजकीय संबंध हे आर्थिक प्रक्रिया व आर्थिक संबंधांवर अवलंबून असतात. सद्यस्थितीत जागतिकीकरणाची मूलतत्त्वे भारतीय अर्थव्यवस्थेत मूळ धरून वाढत असलेली दिसत असताना त्या आधारावर आर्थिक प्रक्रियांची पुनर्रचना करणे तसेच त्या अनुषंगाने आर्थिक विकासाची प्रतिमाने ठरवणे क्रमप्राप्त ठरते.

आर्थिक स्थित्यंतरांच्या काळात राजकीय इच्छाशक्ती व क्रियाक्षमता यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. सत्ता कुठल्या पक्षाची व नेता कोण हा भाग अलाहिदा. आर्थिक विकास हा व्यक्तिसापेक्ष, समाजसापेक्षा नसतो. विकासाला हवी असते आर्थिक शिस्त, प्रक्रियात्मक अंमलबजावणी आणि ती प्रक्रिया राबवणारे हात. या अनुषंगाने आजच्या विकासाच्या गरजा या उपभोग-उत्पादन-नफा-गुंतवणूक या समष्टी प्रक्रियांनी पूर्ण होणार असतील आणि त्यातून एक नवी समाजरचना उदयाला येणार असेल तर ते वास्तव आपण स्वीकारायला हवे; परंतु त्यासाठी गरज आहे ती त्या विकास प्रक्रियेकडे विशिष्ट परिप्रेक्ष्यातून बघणाऱ्या डोळस नेतृत्वाची. साधारणपणे नेतृत्व बदलले की आर्थिक-सामाजिक चौकटी बदलतात आणि अर्थव्यवस्था कात टाकते. पण त्याच वेळी त्यातून सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य होणार की नाही हे पाहणे गरजेचे आहे.

बदलत्या पिढीच्या दृष्टीने विकासपरिमाणे बदलली आहेत. त्यातून एकूणच आर्थिक प्रक्रियांचा रोख बदलताना दिसतो आहे. विद्यमान सरकारच्या, 'किमान प्रशासन व अधिकाधिक शासन' 'Come, Make in India' या घोषणांतून, नियोजनवाद, समाजवादी समाजरचना, आर्थिक समता या तत्त्वांच्या छटा पुसट होताना दिसत असल्या तरी त्यातून भारतीय मानसिकतेला जाणवणारी रोजगाराभिमुख उत्पादन, किमान उत्पन्नाची हमी, गुंतवणूक इ. घटकांची गरज अधोरेखित होते. थोडक्यात भारतीय समाज बदलतो आहे आणि म्हणूनच त्या समाजात असणाऱ्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार विकासप्रकियांचे संचालन करणाऱ्या 'राजकीय अर्थशास्त्राची' (Political Economy) व प्रशासकाची गरज आहे. सरकार व जनता यांच्यातील अनुल्लंघनीय दरी संपुष्टात येऊन खऱ्या अर्थाने, 'लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालवलेले शासन' अशा प्रकारची आदर्श लोकशाही आपल्याला या देशात राबवायची असेल तर त्यासाठी नव्या प्रकारची आर्थिक चौकट तयार करावी लागेल. समाजातील कुठल्याही गटाच्या आर्थिक गरजा दुर्लक्षित राहणार नाहीत अशी काळजी घेऊन सर्वसमावेशक, चिरंतन-शाश्वत विकास ज्या मार्गाने होईल त्या मार्गाचा स्वीकार करावा लागेल. तो विकासमार्ग नियोजन आयोगाच्या वळचणीखालून जात असेल तर नियोजन आयोगाचे अस्तित्व असावे की नसावे हा प्रश्नच उद्भवत नाही; परंतु अशा प्रकारचा विकास नजीकच्या काळात नियोजन आयोगाच्या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमांतून होणे कठीण असेल तर नियोजन आयोगाची पुनर्रचना आणि त्याच्या अस्तित्वाबाबत, कार्यपद्धतीबाबत साधकबाधक विचारविनिमय व प्रभावी कार्यवाही होणे हे अत्यंत स्वागतार्ह पाऊल ठरेल यात शंका नाही.

**अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी**

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक**

जगातील आध्यात्मिक जीवनात जीवात्म्यांची अंतरंगाची हाक किंवा व्यथा काय आहे? त्यांची गळेचेप कशी होतेय आणि परिस्थिती व उपाय काय हवे आहेत?

जगातील सर्व दैवी शरीरबद्ध जीवात्मे (मानवी) आज आपल्याला एका बंदिस्त जेलमधील कैदी असल्यासारखे जाणू लागले आहेत. समाजाच्या भौतिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक बंधनांनी जखडलेल्या कैद्यांसारखे! त्या जेलच्या भिंती म्हणजे आत्मस्वातंत्र्याच्या प्रागतिक जीवनाला देशाच्या राज्यघटनेने उभारलेल्या भिंतीमागील जिवांसारखे!!

आता वेळ आली आहे या सर्व परिस्थितीचा आध्यात्मिक परामर्श घेण्याची व पुनवरालोकन करण्याची.

कारण, ही हाक आहे 'हे लोखंडी दरवाजे' पाडण्याची व ह्या दैवी चैतन्य आत्म्याच्या मुक्त होण्याची आणि विश्वाच्या दैवी जीवनाच्या राजपथावर चालून उत्क्रांती करण्याची. मानवी कॉंशसनेसच्या उच्चतम दिव्य पवित्र जीवनाचा अनुभव व स्वरूप मिळवण्याची !!

**कलियुगात दिव्य जीवनाचा अंत**

ह्या भविष्यातील दिव्य जीवनाची स्वप्ने जन्मजन्मांतरी ह्या जीवात्म्यांनी आपल्या अंतरंगात बाळगली आहेत. त्यांचे कनियुगात बीभत्स अधःपतन व शेवट होताना पाहणे नशिबी आले आहे!! उच्च जीवनमूल्यांचा नाश शरीराबरोबर नष्ट होताना पाहणे नशिबात आले आहे.

काश्मीर हे भारतातील जिवंत उदाहरण आहे. कुठे आहे त्या हिमालयातील 'शिवसूत्रातील' ज्ञानाची अभिव्यक्ती?


**आपली कर्तव्ये**



आपल्या ह्या पवित्र व दैवी भारत राष्ट्रात जन्मलेल्या जीवात्म्यांना एक विशेष दैवी 'कर्तव्यकर्म' वरण्याची जबाबदारी आहे. ही एक विश्वात्मक कृतीची जाणीव आहे.

**कोणती ही कर्तव्ये?**

१) आपल्याला विश्वाच्या उत्पत्तिकालापासून जे 'श्रुतिज्ञान' भारतीय राष्ट्रातील पिढ्यांनी जतन केले ते ईश्वरी ज्ञान, सूर्यज्ञान, आत्मज्ञान हा आपला **'मूल्यवान वारसा'** आहे. हे ईश्वरनिश्वासित ऊर्जेने मिळालेले ज्ञान आहे. ह्या दिव्य ज्ञानाचा सध्याच्या मानवी कॉंशसनेसला त्याच्या मानवी भाषेमध्ये उद्धृत करून व प्रचलित 'पूर्ण योगी भाषेतील' जाणिवेमध्ये स्थापन करणे!!




आनंदात असताना हे माझ्याच बाबतीत का असा प्रश्न आपण विचारतो का? मग दुःखात असतानाही हा प्रश्न विचारण्याचा आपल्याला काहीही हक्क नाही.

२) सध्याच्या काळात असणाऱ्या ज्या ज्या ''आध्यात्मिक पूर्णयोगी संस्था'' आहेत त्यांना हे ज्ञान 'दिव्य वैश्विक सत्याच्या' स्तरावर हस्तांतर करणे. हे ज्ञान व सूर्यज्ञान, ब्रह्मज्ञान अनंत काळपर्यंत मानवी पिढ्यांना जपावे लागणार आहे. भारताने ते जिवापाड जपले आहे!!

३) ह्या ज्ञानाला सत्य वैश्विक सत्यावर पारखून सध्याच्या प्रचलित मानवी ज्ञानाला संस्कारित करणे व त्या ज्ञानाचा जीवनावर प्रत्यक्षात प्रभाव पाडणे. ह्या पद्धतीने ह्या जीवात्म्यांची Aspiration (अभीप्सा) भविष्यात फलित होणार आहे.

४) त्याचबरोबर एक जाणीव महत्त्वाची!! 'भारताचे राजकीय स्वातंत्र्य' म्हणजे जीवात्म्याची अभीप्सा असलेले 'स्वराज्य' नव्हे!! 'स्वराज्या हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे' हे लो. टिळक यांचे घोषवाक्य होते. तेव्हा ह्या स्वराज्याची प्राप्ती होण्यासाठी भौतिकवादी तुरुंगाचे दरवाजे खाडकन उघडून खुले करणे. ज्यामुळे (मानवी) कॉंशसनेसची उत्क्रांतितत्त्वावर आधारलेली विश्वचक्रातील 'राजमार्गी' प्रगती होऊन दिव्यात्मक जीवन भविष्यात प्राप्त होईल!!

हाच मार्ग पृथ्वीवरील अन्य देशातील जीवात्म्यांना उपलब्ध होईल!!

५) ह्या प्रयत्नाला जोड म्हणजे केवळ ज्ञानाबद्दल जाणलेली ही संस्कारणा ज्ञानस्तरावरच राहणार नाही तर ती प्रत्यक्षात उतरण्यासाठी आवश्यक असलेल्या 'योग' व प्रत्यक्षात उतरण्यासाठीच्या क्रिया उपलब्ध करून देणे. त्याकरता आवश्यक असलेल्या भगवद्गीतेतला 'राजयोग', 'राजविद्या', 'पुरुषोत्तम योग' व अरविंदप्रेरित Integral Yoga (पूर्णयोगाची) साधनाची मार्गप्राप्ती करून देणे!!

ही ५ कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी, ह्या पिढीची, भारतीय राष्ट्रावर व शरीरबद्ध जीवात्म्यांवर आहे.

भारताला ही प्रातिनिधिक जबाबदारी जगद्गुरू या नात्याने पार पाडावयाची आहे!!

ह्या कामगिरीसाठी कोणत्या ज्ञानाची, साधनांची आवश्यकता आहे? हे सर्व मानवी ज्ञानाच्या सध्याच्या पातळीबद्दल असणाऱ्या ज्ञानस्तरावरील गुणवत्तेवर अवलंबून आहे!!

प्रथम हे कबूलच केले पाहिजे की ती स्थिती पूर्णपणे गोंधळाची, बुद्धी, मन, विश्वास ह्यांतील गोंधळाची, भ्रमाची व वादांच्या भोवऱ्यात अडकलेल्या जीवात्म्यांची आहे. ह्या जीवात्म्यांना अंतिम परमात्म्याची पातळी प्राप्त करून घ्यायची आहे.

मला वाटते की त्याची सुरुवात एका भक्कम 'श्रद्धेवर' व्हावयाला हवी. ती म्हणजे विश्वोत्पत्ती व चैतन्यजीवनाबद्दलची Creative Action काय होती ह्याबद्दल सिद्धात्मक ज्ञानभूमिका असावयाला हवी.

**Theory of Creation**




ही भूमिका 'नासदीय सूक्तातील' वचनांनी आरंभ केलेली आहे. वेदामधील ह्या शून्यवत विश्वाची कल्पना योग्य आहे. पण त्यानंतर विश्वाची-ब्रह्माची सर्जनक्रिया ज्या क्रमाने व ज्या तत्त्वांवर वर्णन केलेली सापडेल अशी जाणीव जगातील कुठल्याही धर्मात, तत्त्वज्ञानात सापडणार नाही. हा ज्ञानसंभार अत्यंत शुद्ध, सत्य ज्ञानावर आधारलेला आढळेल, तो स्वीकारावा लागेल. हा केवळ 'विश्वासाचा'

आग्रह नाही तर मानवी बुद्धीला आवश्यक असणारा योग्य आधार Compulsary Assumption असेल.

तो स्वीकारल्यानंतरच पुढील विश्वरचनाचे ज्ञान मानवी बुद्धी व मन ह्यांच्या सध्याच्या गुणांवर जाणता येईल.

त्या अगोदरच्या अस्तित्वाची अदृश्य, अव्यक्त, निराकारी अवस्था ही ह्या पद्धतीनेच जाणिवेत उतरू शकेल.

> प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः
> भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात
>
> *Prakritim svām avashtabhya visrijāmi punah punah*
> *bhūta-grāmam imam kritsnam avasham prakriter vashāt*
>
> *Curving back upon My own Nature, I create again and again—creation and administration of creation, both are a natural phenomenon on the basis of My self-referral consciousness.*
>
> *Bhagavad-Gītā 9.8*

हा पर्याय अपरिहार्य आहे. पण तो स्वीकारल्याने पुढचा ज्ञानमार्ग, क्रियामार्ग मानवी आवाक्यात येऊ लागेल व त्याच्या लहान, अज्ञानी मन बुद्धीच्या तर्कसंगतीत प्रगती करू शकतो!!



ह्या भूमिकेवर मी अशा उपायाच्या शोधात होतो. पण उत्तर आत्म्याच्या भूमिकेवरच मिळणार होते. त्या प्रयत्नात मला 'महाशिवरात्रीची अनुभूती हाक' आली असा विश्वास वाटला.



**पुढे काय? महाशिवरात्री साक्षात्कार**

महाशिवरात्रीचा दिवस दिनांक१७/२/२०१५ ला उजाडला. माझ्या जीवनात एका नवीन ज्ञानप्रवाहाचा उगम झाला. तो या अर्थाने की ह्या वर्षातील काही काळ माझ्या प्रकृतिअस्वास्थ्यामुळे साधनेमध्ये विघ्ने आली.

नेमका या सुमारालाच दैवाने हात दिला आणि योगायोगाने टी.व्ही. चॅनेलवर (५०१) 'ब्रह्माकुमारी' संप्रदायाच्या 'शिवशक्ती' आध्यात्मिक मार्गाचा परिचय व साधना शिकवणारा कार्यक्रम 'प्रोजेक्ट' होऊ लागला. म्हणजे सुदैवाने माझ्या हाताला लागला!!



**आध्यात्मिक साधना**

या सुमाराला माझी साधना व ज्ञान एका जंक्शनवर येऊन पोहोचले, थबकले होते. काय होता (काही) संभ्रम?

मी परमपूज्य निकम गुरुजींच्या 'अंबिका योग, ठाणे कुटीरचा' एक साधक; आणि माझ्या परीने 'हठयोगा'चे मला होणारे ज्ञान व क्रियासाधना, होणारी आसने, प्राणायाम यांचा कार्यक्रम यथाशक्ति पुरेसा झाला होता.

ह्यापुढे काय ही उत्सुकता (जिज्ञासा) माझ्यापुढे पडली होती!!

हठयोग हा 'राजयोगाचा' आवश्यक पाया. पण पुढील प्रगतीची सुरुवात कुठल्या 'ज्ञानावर' आधारलेली असणार याची फक्त पुसटशी जाणीव मात्र होती.

## राजविद्या, राजगुह्य, राजयोग

पण सुदैवाने इथे भगवद्गीतेची मदत कामाला आली. गीतेच्या ९ व्या अध्यायातील दोन श्लोक महत्त्वाचे मानायला हवेत. कारण सुरुवातीच्या ८ व्या अध्यायापर्यंत हठयोग आणि सांख्यदर्शन योग ह्यांच्या विचारचौकटीत बसणारा उपदेश, भगवान कृष्णाकडून अर्जुनाला सांगण्यात येत होता.




पण इथे मानवी शरीराच्या शक्ती व मर्यादा एवढेच नव्हे तर काँशसनेसच्या- 'Body Consciousness' च्या पलीकडे जाण्याची गरज आहे हे योगेश्वर भगवान कृष्ण अर्जुनाला सांगत आहेत!!

## काय आहेत हे दोन श्लोक!!

श्री भगवान उवाचः  नवमो ऽ ध्यायः ।
इदं तु ते गुह्यतमं प्रत्वक्ष्याम्यनसूयवे।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥१॥
राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ॥२॥


## लो. टिळक यांचे भाषांतर



१) आता तू दोषदर्शी नाहीस म्हणून गुह्यातले गुह्य असे विज्ञानसहित ज्ञान, जे जाणल्याने पापासून मुक्त होशील. ते हे मी तुला सांगतो (ऐकून).

२) हे (ज्ञान) सर्व गुह्यात राज म्हणजे श्रेष्ठ आहे. राजविद्या म्हणजे सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ, पवित्र, उत्तम-प्रत्यक्ष बोध होणारे, आचरण्यास सुखकारक, अव्यय आणि धर्म्य आहे. ईश्वरप्राप्तीच्या साधनास उपनिषदातून विद्या असे म्हणतात व त्या गुप्त ठेवण्याच्या 'प्रघात' होता. अक्षर किंवा अव्यक्त ब्रह्माच्या ज्ञानास अनुलक्षून हे वर्णन नसून राजविद्या या शब्दाने भक्तिमार्गच ह्या ठिकाणी विवक्षित आहे, हे उघड आहे.

## महायोगी अरविंद यांचे भाषांतर (इंग्रजीत)



1) The Blessed Lord said : What I am going to tell thee, the uncarping is the most secret thing of all, the essential knowledge by knowing which them shall be released from evil.

2) This is the king knowledge, the King Secret (the wisdom of all wisdom, the secret of all secrets); it is a pure and supreme light which one can verify by direct spiritual experience, it is the right and just knowledge, the very law for being. It is easy to practise and is imperismble.

**Two Visionarles**



आता आपण अशा टप्प्यावर आलो आहोत, जिथे भगवद्गीता व दोन महाभाष्यकार व्हिजनरी (Visionary) म्हणजे लोकमान्य टिळक व महायोगी अरविंद एका गूढ राजविद्येची माहिती देणाऱ्या (महाभारतातील अर्जुनाला) भगवान कृष्णाने सांगितलेल्या उपदेशावर (गायनामार्फत, Musical suport) महत्त्वाचे भाष्य करत आहेत.

काय आहे त्यांनी सांगितलेल्या भाष्याची विशेषता

मनातला कोणताही विचार कागदावर सहज येत नाही. तो आधी जगण्यात असावा लागतो.

आणि प्रत्यक्ष साधनेची महत्ता व गूढ साधना?

प्रथम ढोबळ पद्धतीने वर्णन करूया आणि नंतर जास्त विवेचन, मनन, चिंतन व 'विधी' पाहू या :-

१) भगवद्गीतेच्या ९ व्या अध्यायात त्याची सुरुवात झाली आहे. (श्लोक १ व २ वर टिपणी केलीच आहे.)

२) मग राजयोग, राजविद्या व राजगुह्य असा त्याचा आढावा आहे. हा 'राज' योग नाव का? तो गुह्य का? उपनिषदकार (लो. टिळक टीका) गुह्य ह्या 'प्रघाता'चा उल्लेख का करतात?

३) भगवद्गीतेच्या ८ व्या अध्यायापर्यंत 'सांख्यतत्त्वज्ञान आणि परंपरेतील योगाचा उपदेश व मार्ग सतगतीला, ते भगवान कृष्ण आता अर्जुनाकडून कोणती अपेक्षा करतात? त्यात नवीन योगमार्गाच्या काय मागण्या आहेत व त्या पार करणे का आवश्यक आहे, असे सांगतात.

४) ह्या उपदेश ग्रहण करण्याच्या रचनेत साधक व गुरू ह्यांच्या संवादात काय अडचण आहे? साधी भाषिक पातळी अपूर्ण मानून शरीरावर Conciousness व शक्तिच्यापेक्षा उंच, गूढ अशा 'राजयोगी मार्गाचा' का अवलंब करावयाला सांगतात ते अत्यंत सूत्रात्मक पद्धतीने मलाही सांगावे लागणार आहे, हे अगोदर नमूद करतो.

**राजगुह्य उपदेश**

प्रथम आत्मा म्हणजे एक जीवात्मा. हा सूक्ष्म आहे, दिसत नाही. अंतश्चक्षूने जाणला जातो. त्याचे स्थान भुकुटीमध्य ठिकाणी आहे.

आत्मा हा चैतन्यशक्ती आहे व तो शरीरावर सत्ता गाजवतो. आत्मा व शरीर हे संयुक्त स्वरूप मानवी जीवनातले हठयोग, राजयोग वगैरेचे साधन 'ब्रह्मज्ञान' मिळवण्याला मदत करते.

हा राजयोग 'शिव-जग, विश्व-निर्मात्यानेच निर्माण केलेल्या प्रकृती अधिक पुरुष (आत्मा) यांचे त्याच्या स्वतःशी (अव्यक्त परमात्मा) मीलन घडवून 'आध्यात्मिक परिवर्तन' आणतो. ह्या भेटीला (प्रेमळ - Love भाव Energy) 'प्रभू मीलन' असे संबोधले जाते.

आता ह्या राजयोग वा प्रभू मीलनाला आवश्यक परिस्थिती व स्वरूप काय असावयाला हवे ते सांगतो. येथे महायोगी अरविंदांच्या इंग्रजी वाक्यभाषेचा उपयोग अपरिहार्य आहे. तो शक्य त्या सरळ पद्धतीने सांगतो, प्रयत्न करतो!!

"Faith" is necessary - ''श्रद्धा'' (आत्मिक गुण) ही आवश्यक आहे. भौतिक विश्वास ही चीज नव्हे! भगवद्गीता ३/अ.९

अश्रद्धधानाः पुरुषं धर्मस्य परंतप।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसावर्त्यनि ॥३॥अ. ९

**श्रद्धेने बीजात्मक ज्ञान**

महायोगी अरविंद म्हणतात -

"For this is a Truth, which has to be lived and lived in the soul's growing light, not in the mind's darkness. One has to grow into it, one has to become it, that is the only way to verify it. It is only by exceeding of the lower self that one can become the Real divine will" and live the Truth of our "Spiritual Existence!"

या मुद्द्यावर अरविंदांच्या 'Essays on THE GITA' ह्या पुस्तकातील विस्तृत विवेचन वाचून पचनी पाडावयाला हवे!!

ह्या भाष्याचा अर्थ थोडक्यात हा की, राजयोगाच्या क्रियेमध्ये जी जी अनुभूती व ज्ञानाच्या 'लहरी' येतील त्याच्या साक्षात्कारी अर्थाच्या स्वरूपावर, सूक्ष्म संवेदनांवर केवळ विश्वास नव्हे, तर 'आत्मिक श्रद्धा' ठेवावयाला हवी. त्या लहरींच्या मार्फत ज्या गूढ उलगडलेल्या ज्ञानाचे

दगडाने डोकीही फुटतात, पण त्याच दगडाची जर मूर्ती बनवली तर लोक त्यावर डोके टेकतात.

''बीज'' काँशसनेसमध्ये अवतरेल त्याची नैसर्गिक वाढ व्हावयाला हवी व तो आपल्या आत्म्याच्या ह्या नवीन सत्याचा, ज्ञानाचा अविभाज्य भाग, आपल्या वैश्विक सत्य अस्तित्वाचा पूर्ण श्रद्धायुक्त जन्मोजन्मीचा भाग व्हावयाला हवा!! त्व तरच त्या अनुभूतीचे 'परिवर्तन', 'सत्य दैवी इच्छाशक्ती' मध्ये होईल व आपल्या भौतिक अस्तित्वाचे 'दैवी अस्तित्वात' परिवर्तन होऊ शकेल. यशस्वी राजयोगाची परीक्षा व सत्य चिकित्सा पूर्ण होईल!!

**नवीन संस्कार**

पण ह्या क्रिया होण्याकरता खुद्द अर्जुनालासुद्धा वैश्विक सत्याची धारणा त्याच्या अगोदरच्या संस्कार असलेल्या सांख्य दर्शनापेक्षा निराळी ठेवावी लागेल.

कारण ही धारणा 'दैवी संपूर्ण सत्य आध्यात्मिका' आहे (Integret Divinity) आणि मगच तो खऱ्या विश्वरूप दर्शनाचा व पुरुषोत्तमयोगाचा अधिकारी बनू शकेल. त्यामुळे राजयोगाच्या ह्या क्रियांना त्याला स्वतःला 'युक्त' बनावे लागेल आणि त्यासाठी त्याच्या मन व बुद्धी ह्या दोन भौतिक वृत्तीच्या यंत्रणांना दिव्य, दैवी साधने, पवित्र साधने बनणे आवश्यक आहे. जुने संस्कार आणि मनाचे व बुद्धीचे अंधार मिटवावे लागतील !!

''कारण, ज्या प्रकृती व तो स्वतः ह्या 'जगात' जन्माला आला (शरीरबद्ध आत्मा) तोदेखील 'माझ्याच' विश्वनिर्मितीचा भाग आहे!!''

**चीज प्रत्येक**

''एवढेच नव्हे, तर त्या सृष्टीत प्रत्येक चिजेमध्ये मी 'कृष्ण भगवान' अंशरूपाने समाविष्ट आहे. या विश्वासाबरोबरच एक विशेष नवीन जाणीव व संस्कार व्हावयाला हवा.''

''तो म्हणजे 'मी' विश्वात आहे आणि तो व इतर जीव वेगळे बाहेर अस्तित्वात आहेत, असे नसून लोक इतर सर्व माझ्यातच अस्तित्वाचे भाग, अवशेष आहेत.''

**वैज्ञानिक आध्यात्मिकसुद्धा कोडे**




हे नक्कीच कोडे आहे!! हे कोडे, भौतिक विज्ञानाला सुटलेले नाही!! **One is not external to the creator, but a part of 'his' creation!**

त्यामुळे 'अंतर्बाह्य' भगवान कृष्ण आहेत ही 'श्रद्धा' असावयाला हवी. साधकात आहेत, विश्वात आहेत व विश्वाच्या अगदी बाहेरसुद्धा आहेत.

त्यामुळे त्याच्या वैयक्तिक अस्तित्वाला माझ्यात समाविष्ट व्हावे लागेल व 'माझ्या विहित विश्वाच्या परिवर्तनाच्या कार्यक्रमात, माझ्या निर्देशित मार्गाने व आदेशानेच चालावे लागेल. ह्याला पर्याय नाही व स्वतंत्र वैयक्तिकतेचा हट्ट सोडून द्यावा लागेल. त्यालाच 'अहंकार 'Individual Existence' हा टाकून द्यावा लागेल. कारण तो चुकीचा आहे, असत्य आहे, अशक्य स्थितीचा आहे व राजयोगाच्या साधनेतला मोठा अडसर आहे!

**अरविंद भाष्य**

महायोगी अरविंद म्हणतात -

His (अर्जुन) egoistic consciousness only a veil and to his ignorance a miscrepresentation of the real being within him, which is an immortal spark (अमरतत्त्वस्वरूप विद्युल्लताकिरण) and portion of the supreme GOD Head (आणि एक परमात्म्याचा गुणात्मक कर्ता, अवयव आहे)

**आत्मोन्नती**

ज्यामुळे 'वैयक्तिक आत्मोन्नतीला' राजयोग ह्या

---

कधीकधी जीवनात इतकं बेधुंद व्हाव लागतं. दुःखाचे काटे टोचतानाही खळखळू हसावं लागतं.
जीवन यालाच म्हणायच असतं.

विधीचा उपाय सापडला, पण त्यातील 'राजविद्येचे' गूढ ज्या द्वापार युगात दिसले व त्याला भगवान कृष्णाचे पूर्ण मार्गदर्शन लाभले ते अर्जुनाच्या मदतीला आले ही खरी गोष्ट आहे. पण अर्जुनाला वैचारिक उत्तर मिळाले तरी त्याला ''कुरुक्षेत्रावरच्या प्रत्यक्ष प्रसंगाला'' भौतिक कर्माने सामना देणे हे अपरिहार्य होते.





शिवाय वैचारिक पातळीवर मन व बुद्धी या दोन शक्तीची मदत होती. त्या शक्तींची पूर्ण जाणीव व ज्ञान यांचा अभाव होता.

## विश्वरूप दर्शन

म्हणून अर्जुनाने कृष्णाकडे ह्या विश्वज्ञानाच्या 'साकारपणाचा' संपूर्ण स्वरूपाच्या दर्शनाचा हट्ट धरला!!

हे समजण्यासारखे होते हे खरेच, पण ह्या वैश्विक सत्य रचनेचा आकार व स्वरूप एवढे अवाढव्य व गुंतागुंतीचे होते की अर्जुनाच्या स्वतःच्या मन व बुद्धीच्या क्षमतेच्या पलीकडचे होते.

तेव्हा प्रत्यक्ष भगवान कृष्णालाही त्याला न समजू शकणारे व न पेलणारे असे एक वरवरचे, उथळ सोपे दर्शन देऊन समाधान करण्याचा प्रसंग ओढवला. त्यामुळे अर्जुनाला तात्पुरती 'दृष्टी' युक्तीने देऊन त्याला हे विश्वदर्शन घडविले. हे भगवद् गीतेच्या ११ व्या अध्यायात भगवद्गीतेमध्ये महर्षी व्यासांनी वर्णलेले आहे. पण हे पुसटसे विश्वज्ञान केवळ 'Tounst' सारखे पाहिल्याने, ब्रह्मज्ञानाचा बोध होत नाही. त्याकरता जन्मोजन्मीच्या पूर्णयोगाच्या संपूर्ण स्वरूपाची प्राप्ती होईपर्यंत जीवात्म्याला प्रवास करावाच लागतो. बरोबर सूक्ष्म शरीर म्हणजे अंतःकरणचतुष्टय घेऊन. ह्यात अंतःकरणामधील चार


[illegible] छूट सकता है। मृत्यु का बन्धन किस प्रकार छूट सकता है [illegible] अन्तिम प्रश्न है, जो इन मन्त्रों के सम्बन्ध में उत्पन्न होता है। [illegible] प्रश्न का उत्तर सुगमता से समझ में आ जावे इसलिए हम इन [illegible] का एक कल्पित चित्र नीचे देते हैं–

तीनों शरीरों का चित्र

स्थूल शरीर–अन्नमय कोष

सूक्ष्म शरीर–
१. प्राणमय
२. मनोमय
३. विज्ञानमय कोष

कारण शरीर = आनन्दमय कोष

स्वप्नावस्था के द्वारा/सूक्ष्म-कारण शरीरों का सम्बन्ध

| | |
|---|---|
| जाग्रत अवस्था के द्वारा सूक्ष्म = स्थूल शरीरों का सम्बन्ध | प्राण के द्वारा स्थूल-सूक्ष्म शरीरों का सम्बन्ध |

इन्हीं तीनों शरीरों का विभाग एक और प्रकार से किया गया है जिसे कोष कहते हैं उसका विवरण इस प्रकार है–
(१) स्थूल शरीर–अन्नमय कोश
(२) सूक्ष्म शरीर–१. प्राणमय, २. मनोमय, ३. विज्ञानमय कोश।
(३) कारण शरीर–आनन्दमय कोश
योग–३ शरीर–५ कोश
इन तीनों शरीरों के दो सम्बन्ध हैं–
(१) अवस्थाओं के द्वारा सम्बन्ध।
(२) प्राण के द्वारा सम्बन्ध।

भागांना घेऊन (चित्त, बुद्धी, मन, अहंकार) ही सर्व आपल्या पृथ्वीवरील देहबद्ध आत्म्यामधील अस्तित्वात असतात. आपल्याला ती सर्व 'साधारणपणे' दिसत नाहीत किंवा जाणवत नाहीत. पण, त्यांना ह्या भौतिक अस्तित्वात असताना बघणे व संवाद करणे हा हठयोगाचासुद्धा अभ्यासाचा महत्त्वाचा भाग आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'पतंजली योग दर्शन', जे हठयोगाला आदर्शवंत 'सिस्टिम' आहे. त्यात स्वतःच्या चित्तात ध्यान, धारणा, समाधी व त्याच प्रवाही रस असंप्रज्ञात समाधिस्थितीत गेल्यावरच, केवळ 'आत्मदर्शन' होऊ शकते. कसे असेल ते आत्मदर्शन? आपल्याला माहीत आहे की हा जीवात्मा बिंदुस्वरूप आहे, सूक्ष्म आहे. पण, त्याला ज्योति स्वरुपात आज्ञाचक्र स्थानी म्हणजे भ्रुकुटिमध्यात स्थिर करणे व जाणिवेने पाहणे व खातरी करणे हा अभ्यास केला म्हणजे ह्या क्रियेवर (DRILL) आपली सत्ता प्रस्थापित होईल!!

ह्या आज्ञाचक्राच्या वर सहस्रार चक्र आहे आणि ह्या ठिकाणी अनेक ज्ञान व बुद्धी, मन व अंतःकरण चित्त ह्यांच्या क्रियांच्या 'सिस्टिम्स् (Systems) आहेत. त्याच्या जाणिवा स्मृतीमध्ये असून 'आपल्या सूक्ष्म शरीरात' चित्तावर त्या स्थिर होतात. Fix होतात. हा एक महत्त्वाच 'संस्कार' चित्तावर करण्याची व प्रसंगी त्याचे आवाहन करून ह्या क्रियांच्या अभ्यासची स्मृती दृढ करण्याची साधना ही रोज व्हावयाला हवी, तरच हा दृढ संस्कार पुढच्या जीवात्म्याच्या प्रवासात साथ देणार हे लक्षात ठेवा!

आता यापुढची साधना ही ब्रह्मरंध्राची Location मनाने जाणून स्मृतीमध्ये स्थिर करणे. हे ब्रह्मरंध्र म्हणजे जीवात्म्याच्या व ब्रह्माच्या स्वरूपातील एक महत्वाची खिडकी (Window) आहे. हीच खिडकी अंतर्बाह्य स्वरूपाची नाती जाणून प्रयोग, क्रिया करू शकते. मुक्ताबाई ही संत ज्ञानेश्वरांची छोटी बहीण (भगिनी). हिच्या ''मुंगी उडाली आकाशी व तिने गिळिले सूर्याशी' ह्या अनुभूतिजन्य ज्ञानाची जाणीव, चित्ताला व अंतर्ज्ञानाला करून देऊ शकते.

**भीष्म देहत्याग**

तसेच, महर्षी भीष्म जेव्हा महाभारतातील त्यांच्या देहावसनाचा त्याग करतात त्या वेळी ते भगवान कृष्णाच्या हजेरीमध्ये आपला प्राण शरीरातील भिन्न, वेगवेगळ्या भागांत वसत असलेला आपल्या आत्मशक्तीने गतियुक्त करून ह्या ब्रह्मरंध्रातून 'ब्रह्माच्या जगात' प्रवेश करून जीव समर्पण करतात. ब्रह्माच्या पुढील आदेशाच्या कार्यक्रमात ते कृष्णाला प्रश्न विचारतात की माझा पुढला मुक्काम कुठला तेव्हा उत्तर मिळते की तुला पुढली गती व स्थान 'वसू-लोकात' आहे!

तेव्हा हे ब्रह्मरंध्र महत्त्वाचे. ह्या ब्रह्मरंध्रातूनच आपल्या मातेच्या गर्भात मिळणाऱ्या शरीरबीज स्वरूपात हा आत्मा प्रवेश करता झाला, तो आपला भौतिक जगातील 'शरीरप्रवेश व सत्ताग्रहण' प्रसंग होय. हेच गर्भधारण आहे जीवात्म्याचे!




आता या ठिकाणी, आपण आलो आहोत की ह्यासाठी मी आयुष्य असलेल्या शरीराचा त्याग करण्याच्या वेळी काय घटना 'क्रम' आहे?

भगवद्गीता पाठ करू०न किंवा वाचून 'ज्ञानसंपन्न' झालेल्या विद्वानालाही प्रत्यक्ष 'राजयोग' साधना करून त्याचे फलित मिळणे अशक्य आहे. ह्या गूढ गुह्याची थोडी ढोबळ माहिती आपण पाहिली व त्यांतली महायोगी अरविंद यांनी विशद केलेली कोड्याची उकलही पाहिली.

पण त्यांतील 'सांख्यदर्शनाचा' उपयोग माणसाच्या सामान्य शारीरिक व बौद्धिक सामर्थ्यावर आणि भौतिक सीमित मन व बुद्धी ह्या इंद्रियांवर विसंबून कदाचित हठयोग वगैरे साधनेने प्राप्त होणाऱ्या 'वासुदेव' ह्या कॉंशसनेस पातळीपर्यंत साधक पोहोचेल.

पण पुढचा प्रवास हा पंजाब मेलचा एखाद्या जंक्शनवर सांधा नाही बदलला तर त्या 'वासुदेव' (Consciousness) जंक्शनवरच मुक्काम राहील व दिल्लीला जाणे होणार नाही.

**ह्याचे अडचणीचे स्वरूप काय आहे?**

मला ह्या प्रश्नावर कमीत कमी दोन वर्षे थांबावे लागले होते. का? याचे उत्तर माझे एक मित्र (माझ्याहून वृद्ध) श्रीयुत राम प्रधान (सीनियर वार्ताहार) यांच्याशी चर्चा करताना उमगले. ते साध्या शब्दांत सांगितले तर साधनेतला गुह्य भाग काय याचा अंदाज येईल व हाच अनुभूती पायावर उभारलेले गूढ उकलू, जाणवू शकेल.

माझे मित्र श्री. राम प्रधान हे पाण्यात पोहण्याच्या कलेत पारंगत आहेत. त्यांना विचारले असता त्यांनी त्याचे उत्तर दिले.

प्रश्न असा की पाण्यात हात, पाय मारण्यात तरबेज असेलला माणूस जर थकला व बुडण्याची भीती निर्माण झाली आणि आता पुढे किंवा मागे कुठेच जाण्याची क्षमता नाहीशी झाली तर काय प्रसंग ओढवतो?

त्या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले की अशा परिस्थितीत एकदा मी अडकल्यावर पाण्यावर शांतपणे पाठीवर वळून तरंगत राहावयाचे काम केले व तरून गेलो.

परंतु ह्या भूमिकेत आल्यावर बुडणार नाही काही वेळ, पण पुढे जाऊन किनारा लाभणार नाही ना! तेव्हा मदतीचा हात मिळाला तरच कठीण प्रसंग टळेल! हा मदतीचा मार्ग विश्वासासारखा तकलादू नाही तर 'श्रद्धा' या संकल्पनेचा जन्मजन्मांतरीच्या 'आत्मिक श्रद्धेचा' आहे की सूक्ष्म शरीराबरोबर आत्म्याचे साध्य केलेले ज्ञान 'स्मृती' मधून अंतःकरणातून जागृत होऊन मदतीला येते.

ही श्रद्धा कोणती? ही श्रद्धा 'परमात्म्याच्या शक्तीची' आहे. पण ही सगळी 'आयुधे' व 'साधने' अदृश्य व अव्यक्त स्थितीत स्मृतीत आहेत. ती ह्या विश्वाचा 'Creator' निर्माता ह्याच्या 'भक्तीनेच' आवाहनाने जागृत होतात व परमात्म्याच्या मदतीनेच बुडणाऱ्या माणसाला हात देतात.

**प्रत्यक्ष राजयोगाची साधना**

आता इथे आपल्याला 'राजयोगाच्या' ज्ञानाचा परिचय होणे आवश्यक आहे. त्याचे सविस्तर वर्णन आपण दिशाच्या पुढील अंकात पाहू याच, पण इथे अगदी ढोबळपणे एवढे सांगता येईल की इथे पुढच्या योगाची म्हणजे हठयोगाच्या पुढील पायरीची, राजयोगाची सुरुवात आहे!!

**सांख्य (Sankhya)**

इथे मोठे महत्त्वाचे सत्रांतर होते आहे. सांख्यदर्शनातील ज्ञानमार्ग अपुरा पडून Body Consciousness च्या सत्तेतून मुक्त होऊन "Soul Consciousness" मध्ये समर्पण व्हावे लागते. हे अगदी स्वाभाविक आहे कारण हे अपरिहार्यसुद्धा आहे. 'शरीराचे अस्तित्व' शेवट होताना 'प्राण' शरीराला सोडून जातो, असे आपण मानतो ते बरोबरच आहे. पण त्याच प्राणशक्तीच्या पुढच्या प्रकाशात जीवात्मा विश्वाच्या मोठ्या चक्रातील मार्गक्रमणा करू लागतो.

**Advance Course**

पण मग ह्या सध्याच्या पृथ्वीवरील अस्तित्वाचा शेवट होण्याच्या अगोदरच्या शेवटच्या पर्वातील जीवनाचा अर्थ व कार्यक्रम कुठला? तर हा "Advance Course" आपण इथे करू शकतो. त्याचेच वर्णन (Textual) भगवद्गीतेच्या श्लोकातून, 'पुरुषोत्तम योग' व त्याच्या तयारीचा 'राजयोग', दोन्ही करून मिळवता येण्यासारखा आहे.

केवढी आहे ही प्रगती - मर्त्य मानवी देहबद्ध आत्म्याचा नाही का?

पण ह्याचे वर्णन आपण पुढच्या 'दिशा'च्या अंकातून करू या!!

॥ॐ शांतिः॥

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

●●●

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# छत्रपती शिवाजी महाराज

*महाराष्ट्राचे महान राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचे आराध्यदैवत. शिवरायांनी मध्ययुगीन काळात मराठी अस्मिता जागृत करुन मराठयांचे राज्य निर्माण करण्याची किमया केली. इसवी सनाच्या १७ व्या शतकात दख्खनेत अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, गोवळकोंडयाची कूतुबशाही इत्यादी प्रमुख राजकीय सत्ता अस्तित्वात होत्या. याच वेळी उत्तर भारतात तसेच पूर्वेकडे बंगालपर्यंत मुघल साम्राज्य पसरलेले होते. दख्खनमधील निजामशाही, आदिलशाही आदी राजकीय सत्ता बहामनी राजसत्तेचे विघटन झाल्यानंतर निर्माण झाल्या. मुघलशाहीचा विचार केला तर, भारतात मुघल राजघराण्याची मुहूर्तमेढ बाबर याने रोवली. मुघल हे मूळचे मध्य आशियातील फरगाना (Fergana) खोऱ्यातील लोक होते (सध्या हा प्रदेश उझबेकिस्तान या मध्य आशियाई देशात आहे). येथून अफगाण आले. बाबरने काही काळ काबूलवर राज्य केले व इसवी सन १५२६ साली दिल्लीचा तत्कालीन सुलतान इब्राहिम लोदी याच्याशी लढाई करून त्याचा पराभव केला. ही लढाई भारतीय इतिहासात पानिपतची पहिली लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. या पानिपतच्या पहिल्या लढाईनंतर खऱ्या अर्थाने मुघल राजघराण्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. यानंतर बाबरला राजपूत राजांशीदेखील लढाया कराव्या लागल्या व त्यानंतर उत्तर भारतात मुघलांचे राज्य अस्तित्वात आले. दिल्ली ही त्यांची राजधानी झाली. बाबरनंतर हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब हे मुघल सम्राट बनले. औरंगजेब दिल्लीच्या तख्तावर बसला तोपर्यंत मुघल साम्राज्याचा विस्तार वर नमूद केल्याप्रमाणे उत्तरेकडे व पूर्वेकडे मोठ्या प्रमाणात झाला होता. औरंगजेब हा अतिशय महत्त्वाकांक्षी सम्राट होता आणि त्याची नजर दख्खन व दक्षिणेकडील राजकीय घडामोडींकडे होती. त्याला दख्खनेतील राजघराण्यांचा पाडाव करून त्यांची राज्ये काबीज करण्याची इच्छा होती.

या सर्व पार्श्वभूमीवर १७ व्या शतकात शिवरायांचा दख्खनेत उदय झाला. महाराजांच्या जन्माविषयी इतिहासकार व संशोधकांमध्ये दुमत आहे. काही इतिहासकार महाराजांचे जन्मवर्ष १६२७ आहे असे म्हणतात तर काहींच्या मते त्यांचा जन्म इसवी सन १६३० मध्ये झाला. महाराष्ट्र शासनाने काही वर्षांपूर्वी १९ फेब्रुवारी हा दिवस महाराजांचा जन्मदिन म्हणून निश्चित केला आहे. त्यासाठी हरी नरके आदी संशोधकांची समितीदेखील स्थापन करण्यात आली होती. त्या काळात भारतीयांमध्ये असलेल्या सांगोपांग वा शास्त्रशुद्ध पद्धतीनुसार इतिहासलेखनाच्या अभावामुळे महाराजांच्या जन्मतारखेविषयी एकमत नसल्याचे आपणांस जाणवते.

शिवरायांचे पिताश्री शहाजी राजे हे सुरुवातीस अहमदनगरच्या निजामशाहीच्या सेवेत होते व त्यांना चाकणची (पुणे) जहागिरी मिळाली होती. कालांतराने मलिक अंबरसोबत काही मतभेद झाल्यानंतर शहाजी राजांना विजापूरच्या आदिलशहाच्या गटात जावे लागले. कालांतराने शहाजी राजांनी बंगळूर-मैसोरमध्ये आपली जहागिरी कमावली. राजमाता जिजाऊ ह्या शहाजीराजांच्या पहिल्या पत्नी होत्या तर तुकाबाई ह्या दुसऱ्या पत्नी होत्या. शहाजी राजांना जिजाऊंपासून शंभूजी

(संभाजी) व शिवाजी हे दोन पुत्र झाले तर तुकाबाईंपासून व्यंकोजींचा जन्म झाला. शहाजी राजांसोबत तुकाबाई व व्यंकोजी असत तर पुण्याच्या जहागिरीत जिजामाता व शिवराय असत. शिवरायांनी याच पुण्याच्या जहागिरीचे रूपांतर मराठ्यांच्या स्वराज्यात केले तर व्यंकोजींनी पुढे जाऊन दक्षिण भारतातील तंजावरमध्ये (सध्याच्या तामीळनाडूमध्ये) मराठी राज्याची पताका फडकावली.

शिवरायांनी पुणे जिल्ह्याच्या अति पश्चिमेकडील सह्य पर्वतरांगांच्या कुशीत वसलेल्या मावळ प्रांतातून स्वराज्यनिर्मितीची सुरुवात केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. याच परिसरातून महाराजांच्या सुरुवातीच्या काळात त्यांची साथ करणारे येसाजी कंक, बाजी पासलकर, जेधे नाईक इत्यादी मावळे त्यांच्यासोबत ठामपणे उभे राहिले.

इसवी सन १६४६ च्या सुमारास महाराजांनी विजापूरकरांच्या ताब्यातील ‘तोरणा’ हा किल्ला ताब्यात घेऊन स्वराज्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा श्रीगणेशा केला. त्यांनी या किल्ल्याचे नाव ‘प्रचंडगड’ असे ठेवले. कालांतराने हे नाव अनेक लोकांच्या विस्मृतीत गेले. तोरण्यानंतर पुण्याच्या नैर्ऋत्येस असलेला अतिशय अजिंक्य असा कोंढाणा किल्ला विजापूरच्या ताब्यातून घेतला. ही घटना मराठा राज्याच्या स्थापनेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरली कारण भविष्यात शत्रूंशी दोन हात करताना असे दुर्गम किल्ले ताब्यात असणे त्या काळात अत्यंत आवश्यक होते. यानंतर १६४८ साली पुण्यातील पुरंदर हा किल्ला महाराजांनी घेतला व १६५६ मध्ये जावळीच्या मोऱ्यांचा पाडाव केला. सातारा जिल्ह्याच्या वायव्येस जावळीचे संस्थान वसलेले होते. या जावळीवर ज्याचे आधिपत्य असेल त्यास ‘चंद्रराव’ या किताबाने ओळखले जात असे व हा किताब विजापूरच्या राजांनी दिला होता. याचाच अर्थ, जावळीचे मोरे विजारपूरच्या सुलतानांशी एकनिष्ठ होते. जावळीच्या मोऱ्यांना शिवाजी महाराजांचा उदय व वाढता प्रभाव रुचला नाही त्यामुळे शिवाजी महाराजांना त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. जावळी ताब्यात आल्यामुळे महाराजांचा दक्षिणेकडे व कोकणात शिरकाव करण्याचा मार्ग मोकळा झाला. सह्याद्रीच्या कड्यांपलीकडे पश्चिमेला कोकण आहे आणि कोकणात जाणाऱ्या अनेक खिंडी व रस्ते जावळीतून जात होते त्यामुळे महाराजांचा थेट कोकणाशी संपर्क आला व रायगडसारखा दुर्ग - जो भविष्यात मराठा राज्याची राजधानी झाला ताब्यात येण्यास मदत झाली.

अशा तऱ्हेने महाराजांनी हळूहळू दख्खनेत आपले पाय रोवण्यास सुरुवात केली. अर्थात, विजापूरच्या राजवटीने व दिल्लीच्या मुघलांनी या सर्वांकडे कानाडोळा वा दुर्लक्ष केले नाही. त्यामुळेच मुघलांनी प्रामुख्याने औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या विरोधात आघाडी उघडलेली दिसते. याचाच एक भाग म्हणजे राजा जयसिंगाचे महाराष्ट्रातील आगमन, पुरंदरचा वेढा, महाराजांची औरंगजेबाच्या दरबारास भेट, त्यानंतर त्यांना औरंगजेबाने केलेली अटक व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाराजांनी आग्र्यास नजरकैदेतून स्वत:ची केलेली सोडवणूक या घटना होत. महाराजांची आग्र्याहून करून घेतलेली सुटका, ही घटना म्हणजे विश्वास न बसणारा चमत्कार म्हणावा लागेल. उत्तरेत जाण्यापूर्वी महाराजांनी आपल्या राज्याच्या प्रशासनाची जी व्यवस्था केली होती ती वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्या अनुपस्थितीत स्वराज्याचे प्रशासन नेहमीसारखेच सुरळीत चालावे व महाराजांची कमतरता भासू नव्हे यासाठी त्यांनी राजमाता जिजाबाईंच्या हातात राज्याची सर्व सूत्रे सोपवून मोरोपंत (महाराजांचे पेशवे) व निळोजी सोनदेव (महाराजांचे मजूमदार) यांना राजमातांच्या आज्ञेचे पालन करण्यास सांगितले. त्यांच्या ठायी असलेल्या या गुणांमुळेच महाराजांना द्रष्टा वा दूरदृष्टी असलेला राजा म्हणून संबोधले जाते.

विजापुरी सुलतानांनी महाराजांविरुद्ध त्यांचा सरदार अफझलखान यास पाठविले. अफझलखानाने पूर्ण

तयारीनिशी महाराजांचा खातमा करण्याचा प्रयत्न केला, परंतु महाराजांनी अफझलखानासारख्या धिप्पाड व्यक्तीचा १६५९ मध्ये फज्जा उडवला. अफझलखानाला वाटत होते की, तो महाराजांना सहज मारू शकेल. अफझलखानाचा वध हीदेखील अतिशय लक्षणीय घटना आहे. या घटनेमुळे विजापूरच्या सुलतानांचा पुरता थरकाप उडाला.

अशाच विलक्षण घटनाक्रमांमधील अजून एक घटना म्हणजे इसवी सन १६६३ मध्ये महाराजांनी मुघलांचा सरदार शाइस्तेखान याची छाटलेली बोटे ही होय. या घटनेमुळे मुघल बादशाह औरंगजेब एवढा बिथरला की, त्याने शाइस्तेखानाची रवानगी बंगाल या प्रांतात केली. त्या काळात मुघल साम्राज्यातील रिवाजाप्रमाणे बादशहाची मर्जी खप्पा असलेल्या व्यक्तीस बंगाल प्रांतात नेमणूक दिली जात असे कारण हा प्रांत दिल्लीपासून फार दूर होता व तेथे अनेकदा बंडांची टांगती तलवार असे.

शिवरायांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारी अजून एक घटना म्हणजे महाराजांनी इसवी सन १६७४ साली केलेला राज्याभिषेक सोहळा. रायगडावर संपन्न झालेल्या या राज्याभिषेक सोहळ्यानंतर त्यांनी छत्रपती हा किताब घेतला व मराठा राज्याचा राजा म्हणून स्वत:चे स्थान भक्कम केले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. राज्याभिषेकाचे महत्त्व म्हणजे विजापूरच्या आदिलशहाला जास्त मान देणाऱ्या व त्याची मांडलिकी करणाऱ्या सरदारांना महाराजांनी आपणही एका स्वतंत्र राज्याचे सार्वभौम राजे आहोत हा नि:संदिग्ध इशारा दिला. राज्याभिषेकानंतर महाराजांनी स्वत:च्या राज्याची नाणीदेखील पाडली व शिवराज्याभिषेकानंतर मराठी सत्तेचे एक नवीन युग सुरू झाले.

राज्याभिषेकाच्या वेळी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने हेन्री ऑक्झेंडन हा इंग्रज प्रतिनिधी रायगडावर हजर होता. त्याने लेखी स्वरूपात राज्याभिषेकाची नोंद ठेवली आहे. राज्याभिषेक संपन्न झाल्यानंतर महाराज व इंग्रजांमध्ये शांतता प्रस्थापित झाली. त्यानंतर ब्रिटिशांचा मराठा राज्यात वखारी स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला. राज्याभिषेकानंतर महाराजांनी मुलकी, लष्करी, महसूल व न्यायव्यवस्थेबाबत नवीन नियमावली लागू केली. या नियमावलीस 'पद्धती' असे संबोधले जाते. लेखनपद्धती व पत्रव्यवहाराच्या भाषेवर जो फारसी भाषेचा प्रभाव होता तोदेखील महाराजांनी कमी केला आणि पत्रव्यवहार व राज्यकारभारात संस्कृत शब्दांचा जास्तीत जास्त वापर करण्याचा दंडक घालून दिला. अनेक फारसी शब्दांऐवजी संस्कृत शब्द योजण्याचे / वापरण्याचे निर्देश देण्यात आले व रघुनाथ पंडित यांना असे पारिभाषिक शब्द बनविण्याचे वा शोधण्याचे काम देण्यात आले. त्यांनी तयार केलेल्या या कोशास 'राज्यव्यहारकोश' असे संबोधले जाते. या कामात रघुनाथ पंडितांनी अनेक विद्वानांची मदत घेतली. अशाच विद्वानांपैकी धुंडिराज लक्ष्मण व्यास हे एक होते. यानंतर राज्यव्यवहारात पंत सचिव, पंत अमात्य, सेनापती, प्रांत, राजमंडल, न्यायाधीश इत्यादी संस्कृत शब्द वापरात येऊ लागले. ही बाब भारतीय संस्कृती व संस्कृत भाषेविषयी शिवरायांना असलेला जिव्हाळा दर्शविते.

शिवाजी महाराजांच्या द्रष्टेपणाचे अजून एक उदाहरण म्हणजे त्यांनी महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर उभारलेले जलदुर्ग व मराठ्यांच्या आरमार बळकटीच्या दृष्टीने केलेले प्रयत्न हे होय. तसे पाहता, शिवरायांना शहाजी राजांकडून पुणे व चाकणची पश्चिम घाटापलीकडची(पश्चिम घाटाच्या पूर्वेकडची) जहागीर मिळाली होती. मात्र, शिवरायांनी मराठी राज्याची स्थापना करण्याचा दृढ निश्चय केल्यानंतर एकापाठोपाठ अनेक प्रदेश व किल्ले ताब्यात घेण्यास सुरुवात केली. इसवी सन १६५८ च्या सुमारास शिवरायांनी उत्तर कोकणातील कल्याण व भिवंडी (ही ठिकाणे सध्याच्या ठाणे जिल्ह्यात आहेत) ही ठिकाणे ताब्यात घेतल्यानंतर तेथील खाड्यांमध्ये स्वतःची जहाजे

बांधून घेण्यास सुरुवात केली. यानंतर दक्षिण कोकण ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी तेथील समुद्रकिनाऱ्याचे गोव्यापर्यंत सर्वेक्षण केले आणि त्यानंतर तेथे नवीन आरमार केंद्रे उभारण्यास व अगोदरच अस्तित्वात असलेली आरमार केंद्रे बळकट करण्यास सुरुवात केली. कल्याण व भिवंडीवर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर महाराजांना जंजिऱ्यांच्या सिद्दींचाही बंदोबस्त करावयाचा होता कारण त्यांना ठाऊक होते की, जंजिऱ्याचे सिद्दी हे मुळात पूर्व आफ्रिकेतील ॲबिसीनिया (सध्याचा इथिओपिया) या देशातील होते आणि सुरुवातीस त्यांनी अहमदनगरचा निजामशहाचे, तद्नंतर विजापूर आदिलशहाचे व शेवटी-शेवटी तर मुघलांचे महाराष्ट्राच्या समुद्रकिनारपट्टीवरील नौदलाचे (आरमाराचे) प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली होती. शिवरायांनी सिद्दींचा जमिनीवरील (भूभागावरील) बराच प्रदेश काबीज केला होता परंतु सिद्दींना त्यांच्या अरबी समुद्रातील जंजिरा या किल्ल्याचे रक्षण करण्यात यश आलेले आढळते. सिद्दींप्रमाणेच शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज व इंग्रज या परकीयांपासूनदेखील स्वराज्यास पश्चिम तटावरून (किनारपट्टीवरून) धोका आहे, हे ताडले होते. त्यामुळे त्यांनी आरमार तळ बळकट करतानाच सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, कुलाबा, खांदेरी इत्यादी जलदुर्ग बांधले व इतर अनेक ठिकाणीदेखील जलदुर्गांची निर्मिती केली. भारताचा इतिहास अभ्यासल्यानंतर असे जाणवते की, इसवी सनाच्या ७ व्या शतकापासून अनेकदा अनेक परकीय जलमार्गाने भारताच्या व महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आले. या परकीयांपासून एतद्देशीय सत्तांना व भारतीयांना धोका होऊ शकतो ही जाण असणाऱ्या द्रष्ट्या राजांपैकी शिवाजी महाराज हे एक होते हे वरील विवेचनावरून जाणवते.

शिवरायांनी आपल्या प्रशासकीय व्यवस्थेकडे प्रकर्षाने लक्ष दिल्याचे जाणवते. त्यामुळेच त्यांनी नागरी व लष्करी प्रशासनात कडक शिस्तीचे पालन व्हावे असा शिरस्ता घालून दिला. प्रशासनाकडे कानाडोळा वा दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. त्यामुळेच त्यांच्या काळात उच्च प्रतीची प्रशासकीय व्यवस्था होती असे इतिहासकारांचे म्हणणे आहे.

शिवाजी महाराजांचा बराच वेळ व कारकिर्द जरी विजापूरच्या सुलतानांच्या व मुघल बादशहांच्या विरोधात लढण्यात गेला तरी त्यांनी मराठा राज्यात व्यापारउदिमाची वाढ करण्यासाठी प्रयत्न केले. युरोपियन व्यापाऱ्यांवर मात्र शिवरायांची करडी नजर असे कारण बरेच युरोपियन व्यापारी ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचा उपद्व्यापदेखील करीत असत. त्यामुळे त्यांना व्यापार करण्याची अनुमती दिली जात असे मात्र ते व्यापाराव्यतिरिक्त इतर उद्योग करत आहेत काय, याकडेदेखील प्रशासन लक्ष ठेवून असे. शिवरायांच्या काळात कल्याण, भिवंडी, चौल, राजापूर, वेंगुर्ला, कोल्हापूर, कऱ्हाड इत्यादी ठिकाणे महत्त्वाची व्यापारी केंद्रे म्हणून नावारूपास आली होती.

शिवरायांचा अजून एक महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांना संतमंडळींचा सहवास आवडत असे. त्यांनी पाटगावचे मौनीबाबा, केळशीचे बाबा याकूत, केंजळचे केवल भारती, जालन्याचे तन पाठक, मुधळगावचे देवभारती, महाबळेश्वरचे स्वानंदस्वामी व गोपाळभट, चाकणचे सिद्धेश्वरभट ब्रह्मे, चिंचवडचे देव गोसावी इत्यादी संतांचा यथायोग्य सन्मान केल्याचे आपणांस आढळते. या संतांमध्ये मुस्लीम संतांचादेखील समावेश होता ही बाब येथे विशेष नोंद घेण्यासारखी आहे. यावरून ही गोष्ट सिद्ध होते की, महाराजांना आपल्या हिंदू धर्माचा सार्थ अभिमान तर होताच मात्र त्याचबरोबर त्यांना इतर धर्मांविषयीदेखील आदर होता. मराठा राज्यात मुस्लिमांचीदेखील लक्षणीय संख्या होती व त्यांना सर्व प्रकारचे धार्मिक स्वातंत्र्य होते. महाराज धर्मापलीकडे जाऊन विचार करत याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्या दरबारात व सेवेत असलेले

मुस्लीम अधिकारी होत. महाराजांच्या आरमाराची धुरा दौलतखान व सिद्दी मिसरी या अधिकाऱ्यांकडे होती. मदारी मेहतर हा दुसरा मुस्लीम महाराजांचा खाजगी सेवक होता. तो महाराजांची राजदरबारात व राजदरबार संपल्यानंतरदेखील विशेष काळजी घेत असे. याच मदारी मेहतराने महाराजांची आग्रा येथील नजरकैदेतून सुटका होण्यातदेखील महत्त्वाची भूमिका बजावली होती. महाराजांचा अतिशय विश्वासातील परराष्ट्रीय सचिव (मुंशी) हा मुल्ला हैदर नामक मुस्लीम होता. तो महाराजांची फारसी भाषेतील पत्रे लिहीत असे व एकदा त्याला महाराजांनी मुघलांचा दख्खनेतील सुभेदार बहादूरखान याच्यासोबत शांतिवार्ता करण्यासाठी दूत म्हणून पाठविले होते.

महाराजांच्या बाबतीत लिहिताना त्यांचा अजून एक पैलू महत्त्वाचा ठरतो व तो म्हणजे त्यांचे स्वच्छ चारित्र्य हा होय. त्यांना परस्त्रियांविषयी नितांत आदर होता व स्वराज्यातील स्त्रियांचा सन्मान राखणे हे आपले परम कर्तव्य आहे असे ते समजत. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे जेव्हा महाराजांनी उत्तर कोकणातील कल्याण हे ठिकाण ताब्यात घेतले तेव्हा आबाजी सोनदेव यांना कल्याणच्या व्यवस्थापनाची जबाबदारी दिली. आबाजी सोनदेव यांनी त्यानंतर तेथील एका सुंदर मुस्लीम मुलीस ताब्यात घेऊन शिवरायांना नजराणा म्हणून पेश केले. या प्रसंगी महाराजांनी त्या स्त्रीला पाहून काढलेले उद्गार महत्त्वाचे आहेत. ते म्हणाले की, जर आमच्या माँसाहेब या स्त्रीएवढ्या सुंदर असत्या तर आम्हीदेखील असेच सुंदर दिसलो असतो. महाराजांनी या स्त्रीला दागिने देऊन व चोळी बांगडी करून तिला तिच्या आप्तेष्टांकडे विजापूरला ५०० सैनिकांसोबत पाठवून दिले. ही स्त्री, विजापूरचा कल्याण प्रांताचा पूर्वीचा सुभेदार मुल्ला अहमद नवायत याची सून होती असे म्हटले जाते. मुस्लीम इतिहासकार काफीखान यानेदेखील महाराजांचे धार्मिक, नैतिक व सामाजिकदृष्ट्या असलेले वर्तन, परस्त्रीविषयी असलेला आदर व स्त्रीदाक्षिण्य या गुणांची प्रशंसा केलेली आढळते.

महाराजांनी आपल्या सैनिकांनाही नेहमी शेतकऱ्यांचा आदर करण्याचा सल्ला दिलेला होता. महाराजांचे धर्मविषयक विचार किती उदारमतवादी व प्रगल्भ होते हे त्यांनी मुघल सम्राट औरंगजेब यास लिहिलेल्या पत्रावरून आढळते. सदर पत्रात त्यांनी लिहिले होते की, इस्लाम व हिंदू धर्म हे दैवी शक्तीने बनविलेल्या दोन सुंदर चित्रकलाकृती असून या सुंदर चित्रांवर रेषा ओढणे म्हणजे दैवी शक्तीस दिलेला दोष होय व कोणीही धर्माधर्मांमध्ये द्वेष पेरत असेल तर तो देवाच्या आज्ञेविरुद्ध कार्य करतो आहे असे ठरेल.

अशा तऱ्हेने शिवरायांचे चरित्र हे येणाऱ्या पिढ्यांना नेहमीच प्रेरणादायी ठरेल यात काहीच शंका नाही. अशा महापुरुषांची चरित्रे आजच्या मुलांनी वाचणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांच्यावर चांगले संस्कार घडतील व ती चांगले पुत्र, पिता आणि देशाचे नागरिक बनतील. महाराजांचे चरित्र अनेकांनी लिहिले आहे. यांत सर जदुनाथ सरकार, रॅवलिसन, किंकेड, डॉ. बालकृष्ण, केळुसकर, कुलकर्णी, सरदेसाई, शेजवलकर, भावे, गजानन मेहेंदळे, सेतुमाधवराव पगडी आदींचा समावेश आहे. तरुणांनी यांतील काही चरित्रे वाचली तरी या लेखाचे सार्थक होईल. सरतेशेवटी असे म्हणावेसे वाटते की, शिवरायांसारख्या रयतेच्या खऱ्या जाणत्या राजास मानाचा मुजरा !!

**संदर्भ :-**

पगडी सेतुमाधवराव - छत्रपती शिवाजी
मेहेंदळे गजानन - शिवाजी - हिज लाइफ अँड टाइम्स
सरदेसाई जी.एस. - न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज्
सरकार जदुनाथ - शिवाजी अँड हिज टाइम्स

**साहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते. सुट्टी ही त्याच्यासाठी नवं काहीतरी शिकण्याची संधी असते.

# परिसर वार्ता

- संकलित

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### विद्यार्थ्यांचे अभिनंदन

प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील कु. केतकी गोखले या विद्यार्थिनीने आंतरविद्यापीठीय स्पर्धेत जिम्नॅस्टिक या क्रीडाप्रकारात कांस्यपदक व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील कु. मृदुला सावंत या विद्यार्थिनीला आंतरमहाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत कांस्यपदक मिळाले.

तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील कु.दिना माने या विद्यार्थिनीला बॉक्सिंग या स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त झाले आहे.

"Mallinath Internation Foundation for Earth and Environment (Mifee) यांनी आयोजित केलेल्या National Environment Talent Search Examination NETSE-2014 यामध्ये कु. नेहा शंकर श्रीरामुल्ला या विद्यार्थिनीला कांस्यपदक मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

माहिती तंत्रज्ञानाच्या तृतीय वर्षाला असणाऱ्या व राष्ट्रीय छात्र सेनेत सीनिअर अंडर ऑफिसर असणाऱ्या कु. दीप्ती राऊत हिने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा 'Unmesh' १३ यामध्ये Best Cadet ('उत्कृष्ट छात्र') म्हणून प्रथम पुरस्कार पटकाविला आहे. भारतीय नौसेना कॅप्टन सानिहाल यांच्या हस्ते तिला पदक व सन्मानचिन्ह बहाल करण्यात आले.

संगणक विज्ञान विषयामध्ये द्वितीय वर्षाला असणाऱ्या व राष्ट्रीय छात्र सेनेच्या दुसऱ्या वर्षाचे प्रशिक्षण घेत असलेल्या सीनिअर अंडर ऑफिसर कु. अक्षय पाटील याने नाशिक येथे झालेल्या थळ सैनिक कॅम्पमध्ये 'उत्कृष्ट छात्र' (Best Cadet) म्हणून सुवर्णपदक मिळविले.

नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प (NIC) हा राष्ट्रीय छात्र सेनेचा राष्ट्रीय कॅम्प असतो. केरळमध्ये भरविण्यात आलेल्या या शिबिरात 'राष्ट्रीय एकात्मता' या सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्या सर्वांगीण कलादर्शनाने द्वितीय वर्षात शिकत असलेला सीनिअर अंडर ऑफिसर कु. अनिकेत क्षीरसागर हा छात्र 'रजतपदक' मिळवून दुसरा आला.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना युनिट (Army) मध्ये द्वितीय वर्षाला असणाऱ्या सीनिअर अंडर ऑफिसर कु. सुदीप सावंत याची राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट छात्र म्हणून निवड झाली आहे. प्रथम नाशिकच्या 'थळ सैनिक कॅम्पमधून' निवड झाल्यावर अमरावती आणि पुढे दिल्ली अशी जिल्हा पातळीवरून राष्ट्रीय पातळीवर निवड होऊन 'Best Firer' (उत्कृष्ट नेमबाज) म्हणूनही त्याला विशेष पदक बहाल करण्यात आले.

अकरावीमध्ये शिकणाऱ्या कु. वैष्णवी गेजी ह्या विद्यार्थिनीने आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर २०१४-१५ मध्ये झालेल्या महाविद्यालयीन विविध क्रीडास्पर्धांमधून बक्षिसे मिळवून 'Student of the Year' चा मान मिळविला आहे.

संघमित्रा रामस्वरूप सरोज मित्तल, वनस्पतिशास्त्र विभाग यांना डॉ. एम. एस. मुळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पतिशास्त्रातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) ही पदवी प्राप्त झाली.

### शिक्षकांचे अभिनंदन

विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा.डी.आर.आंबावडेकर यांना रसायनशास्त्रातील डॉक्टरेट (Ph.D.) पदवी २० मार्च २०१५ रोजी मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात प्रदान करण्यात आली.

''(Study of organic liquid, Liquid mixtures of Esters in cyclic Ethers)'' म्हणजेच ''आवर्तित

इथरमधील इस्टरचे द्राव्य मिश्रण व सेंद्रिय रसायनींचा अभ्यास'' हा त्यांचा पीएच.डी. संशोधनाचा विषय होता. प्रा.आंबावडेकर यांनी आपले हे संशोधन बांदोडकर महाविद्यालयाचे रसायनशास्त्रातील साहा. प्राध्यापक डॉ. एम. व्ही. रत्नम यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.



महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व उपप्राचार्य डॉ. प्रा. आर. पी. आठल्ये यांनी प्रा. डॉ. आंबावडेकर यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

बांदोडकर महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. एम. एस. मुळगावकर यांना निसर्गसंवर्धनाच्या क्षेत्रामध्ये केलेल्या कार्याबद्दल त्यांना ठाण्याच्या स्वानंद संस्थेतर्फे 'प्रज्ञानंद' पुरस्कार देण्यात आला.

रसायनशास्त्र विभागातील प्रा.प्रकाश माळी यांचा विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग होता व त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. ते पुढीलप्रमाणे -

- दि.९ व १० जानेवारी २०१५ रोजी यूजीसीने आयोजित केलेल्या Women's Quest for Equality in India-Promises, Problems and Prospects या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेतला.
- दि.२२,२३,२४ जानेवारी २०१५ रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या Gandharva's १५ च्या Solo Singing (Teachers) स्पर्धेमध्ये भाग घेतला.
- प्रा. प्रकाश माळी,रसायनशास्त्र विभाग यांना दि. ०७.०१.२०१५ रोजी ''लेक लाडकी'' अभियानांतर्गत समाजसेवेबद्दल ''बहुजन सन्मान पुरस्कार २०१५'' प्रदान करण्यात आला.
- दि. ११ जानेवारी २०१५ रोजी आनंद कल्याणकारी सामाजिक संस्था, डोंबिवली यांच्यातर्फे ''ज्वेल्स ऑफ इंडिया'' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ''आम्ही असे घडलो'' या ग्रंथातून माळी सरांचे उज्ज्वल सामाजिक कार्य दिसून येते.
- जिल्हा परिषद, ठाणे 'माध्यमिक शिक्षण विभाग' आणि महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि.६.जानेवारी २०१५ रोजी सावित्रीबाई फुले नाट्यगृह, डोंबिवली येथे ''सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन : कार्यशाळा'' या कार्यशाळेत सहभाग घेतला.

NCRD'S Sterling Institute of Management Studies ने आयोजित केलेल्या Emergence of India as a Global Economy Challenges and Opportunities या आंतरराष्ट्रीय परिषद २०१५ मध्ये प्रा. सोनी यादव यांनी सहभाग घेतला व Latest Variants of Authentication Using 3 D Secure Protocol हा पेपर सादर केला. याच परिषदेत प्रा. रेणुका सभापती यांनी सहभाग घेतला व Latest Variants of Authentication Using 3 D Secure Protocol हा पेपर सादर केला. तसेच प्रा. मीनाक्षी यादव यांनी सहभाग घेतला व Latest Variants of Authentication Using 3 D Secure Protocol हा पेपर सादर केला.

प्रा. आकांक्षा शिंदे, गणित विभाग यांनी दि. २२ व २३ जानेवारी २०१५ रोजी जमल महमद कॉलेज तिरुचिरापल्ली, तामीळनाडू येथे आयोजित केलेल्या Conference on Mathematics and Computation या परिषदेमध्ये सहभाग घेतला व संशोधन पेपर सादर केला.

प्रा. प्रल्हाद श्रीराम वाघ यांनी रसायनशास्त्र विषयात पाचव्यांदा नेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांनी डिसेंबर २०१४ रोजी नुकत्याच झालेल्या नेट परीक्षेत रसायनशास्त्र विषयात बहुमानाची समजली जाणारी सी.एस.आय.आर. ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (CSIR-JRF) परीक्षा उत्तीर्ण केली आहे. पुन्हा पुन्हा नेट परीक्षा देऊन ते आपले रसायनशास्त्रातील प्रावीण्य अजमावीत असतात.

**ठाणे महानगरपालिकेच्या जिल्हास्तरीय क्रिडास्पर्धांमध्ये बांदोडकर कॉलेजचे यश**

ठाणे महानगरपालिका क्रीडाविभाग व युवकसेवा

संचालनालय आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने विविध सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन नेहमीप्रमाणेच आपल्या प्रावीण्याची मोहोर उमटवली. १९ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ उपविजेता ठरला. त्याचप्रमाणे १९ वर्षांखालील मुलींच्या गटात टेबलटेनिसमध्ये महाविद्यालयाचा मुलींचा संघ विजयी ठरला. यामध्ये वेदांत दळवी (बुद्धिबळ), विशाल महाडिक (ॲथेलेटीक्स), अदित्य बेहेर व वैष्णवी गेज्जी (टेबलटेनिस) प्रवीण साखरे, सागर बागुल, सूरज सोनावणे (कॅरम) यांनी वैयक्तिक गटात आपली चमक दाखवली.



या सर्व स्पर्धांची तयारी विद्यार्थ्यांकडून करून घेण्यासाठी जिमखान्याच्या प्रा. रोहिणी डोंबे व देवयानी लढे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या या जिल्हास्तरीय यशाबद्दल व ठाणे महानगरपालिकेत बांदोडकरची मोहोर उमटविल्याबद्दल जिमखाना अध्यक्ष प्रा. बामणे यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.




**बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा ''रामकृष्ण बजाज प्रशस्ती प्रमाणपत्र (Commendation Certificate)"**

विद्या प्रसारक मंडळ संचालित बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला आय. एम. सी. रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी ॲवार्ड ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या आय. एम. सी. रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी ॲवॉर्ड २०१४ चे शैक्षणिक विभागातील प्रशस्ती प्रमाणपत्र (Commendation Certificate) प्राप्त झाले आहे. २० मार्च २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे जगज्जेते बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांच्या हस्ते हे प्रमाणपत्र देण्यात आले.

रामकृष्ण बजाज ही संस्था दर्जेदार कामाचे कौतुक करणारी अत्युच्च संस्था मानली जाते. एवढ्या मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेले हे राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र म्हणजे महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना, शिक्षकांना, उपक्रमांना, ग्रंथालयाला, प्रशासनाला आणि सोयीसुविधांना मिळालेली कौतुकाची पावतीच आहे.

ठाण्यातील अतिशय नावाजलेले बांदोडकर महाविद्यालय आता ४६ वर्षांचे झाले आहे. या महाविद्यालयास बंगलोरमधील NAAC या संस्थेने २०१० मध्ये 'अ' दर्जाचे मानांकन दिले व मुंबई विद्यापीठाने २०११ मध्ये ''उत्कृष्ट महाविद्यालय'' म्हणून गौरविले आहे.

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान (DST) या विभागाकडून महाविद्यालयास एक कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. शैक्षणिक सुविधा वाढवणे, संशोधन प्रयोगशाळांमध्ये सुधारणा करणे व उच्च प्रतीच्या संशोधनाचा पाया बळकट करणे यासाठी हे अनुदान दिले जाते. बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असे एकमेव विज्ञान महाविद्यालय आहे, ज्यात फक्त विज्ञान शाखाच शिकविली जाते.

या महाविद्यालयात पदवी स्तरावर एकूण १२ विषय शिकविले जातात. त्यातील ०४ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, पर्यावरणशास्त्र व माहिती आणि तंत्रज्ञान या विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची (एम.एस.सी.) तर ५ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र,

पदार्थविज्ञान, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र व पर्यावरणशास्त्र या विषयांमध्ये संशोधनाची व पीएच. डी.चीही सोय आहे. महाविद्यालयातील १३ शिक्षकांना संशोधनाकरता मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाची मान्यता आहे. महाविद्यालयातून आतापर्यंत ६५ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली आहे तर गेल्या ५ वर्षांत २०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय जर्नलमधून सादर झाले आहेत.

**राष्ट्रीय मतदार दिनाचा जागर**
**विद्यार्थ्यांनी कलेच्या माध्यमातून केली मतदार जागृती**

२५ जानेवारी २०१५ या दिवशी बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अकरावी ते पदव्युत्तर वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विविध कलामाध्यमांतून (उदा.रांगोळी. पथनाट्य, वाद-विवाद, वक्तृत्व, भित्तिपत्रके, घोषवाक्ये इ.) मतदार दिवसाचे औचित्य साधून जनजागृती केली.

या वेळी कनिष्ठ महाविद्यालयातील सोहम बारी व धृती अय्यर ह्या दोन विद्यार्थ्यांना वक्तृत्व-वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. त्यांना ठाणे तहसीलदार कार्यालयाकडून विशेष प्रशस्तिपत्र बहाल करण्यात आले. या वेळी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी मा. सौ. सरदेसाई, अभिनेता संतोष जुवेकर व नाट्यदिग्दर्शक मा. श्री. अशोक समेळ उपस्थित होते. तसेच पदवी महाविद्यालयातून घेतलेल्या वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेतून कु. सराफ सैय्यद ही विद्यार्थिनी प्रथम आली.

बांदोडकर महाविद्यालय नेहमीच अशा मोहिमांमध्ये अग्रेसर असते. एक सामजिक बांधीलकी म्हणून व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक एकतेची बीजे रुजावी म्हणून महाविद्यालयाचा प्रयत्न असतो. या अभियानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ.प्रा.किरण पारिया, सांस्कृतिक विभागाचे प्रा. प्रकाश माळी तसेच जागर जाणिवांचा अभियानाचे प्रा.अनिल आठवले व राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी प्रा.बिपिन धुमाळे सहभागी झाले होते. या सर्वांना वाङ्मय मंडळाच्या समन्वयक प्रा.मंजिरी रानडे, तहसीलदार कार्यालयाकडून विशेष बाब म्हणून सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले व या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या जनजागृती मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

**'मुंबई परिसरातील सर्पविविधता' या विषयावर व्याख्यान संपन्न**

बा. ना. बांदोडकर महाविद्यालय व होप नेचर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यामाने पर्यावरणविषयक जनजागृती करण्याकरता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेतील पाचवे पुष्प श्री. अविनाश भगत, सर्पमित्र यांचे 'मुंबई परिसरातील सर्पविविधता' या विषयावर १४ मार्च २०१५ रोजी अर्पित झाले.

श्री. अविनाश भगत हे Envirovigil या संस्थेत प्रकल्प संयोजक म्हणून कार्य करतात. तसेच गेली ५ वर्षे ते सर्पमित्र म्हणून काम करीत आहेत.

या व्याख्यानाच्या सुरुवातीला श्री.अविनाश भगत यांनी सापांविषयी मूलभूत गोष्टी जसे सापांची रचना, प्रजनन, त्वचा रंग व सर्वसाधारणपणे त्यांचे जगणे याबद्दल माहिती दिली. विषारी, बिनविषारी व कमी विषारी असे मुख्यत्वे तीन प्रकाराचे साप आढळतात असे त्यांनी सांगितले.

व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी साप चावल्यानंतर करावयाच्या प्राथमिक उपचारांची माहिती दिली. साप चावल्यानंतर मज्जासंस्था व रक्ताभिसरण संस्थेवर काय परिणाम होतो हे सांगितले तसेच हाफकिन संस्था, मुंबई ही प्रतिविष तयार करण्याचे कार्य करते असा उल्लेखही त्यांनी केला.

वरील कार्यक्रमाला ५० विद्यार्थी हजर होते.

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

१) **सरावपरीक्षा**

विद्या प्रसारक मंडळाच्या टी.एम.सी. विधी महाविद्यालयाने प्रथम, द्वितीय व तृतीय विधी

वर्गाच्या अनुक्रमे सत्र दोन, चार व सहाची सराव परीक्षा दिनांक १ ते ८ एप्रिल या दरम्यान घेतली.

२) **सत्र परीक्षा**
मुंबई विद्यापीठाच्या विधी या विषयाच्या सत्र एक, तीन व पाच यांची परीक्षा पार पडली. महाविद्यालय हे केंद्र असल्याने येथे ही परीक्षा घेण्यात आली होती. तसेच सत्र दोन, चार व सहा यांची परीक्षाही दिनांक २४ एप्रिल रोजी सुरू झाली व ती दिनांक ११ मे पर्यंत चालणार आहे.

३) **तपासणी केंद्र**
नुकत्याच पार पडलेल्या विधी विषयाच्या परीक्षेचे पेपर महाविद्यालयात तपासणीसाठी आले. महाविद्यालयातील तपासणी केंद्र सकाळी १० ते सायं. ८ पर्यंत खुले असते.

४) भीमराव बी प्रधान महाविद्यालय यांनी आयोजित केलेल्या 'सर्वांगीण विकास' या सेमिनारमध्ये महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी "Socially Inclusive Legislative Bodies" या विषयावर पेपर सादर केला. तसेच या सेमिनारमध्ये प्रा. विनोद वाघ व ग्रंथपाल शीतल औताडे यांनीदेखील पेपर दाखल केले. सदर सेमिनार दिनांक १८ एप्रिल २०१५ रोजी पार पडले.

५) **डॉ. आंबेडकर जयंती**
महाविद्यालयाने दिनांक १४ एप्रिल २०१५ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयामध्ये त्यांच्या पुस्तकांचे तसेच इतर पुस्तकांचे प्रदर्शन भरविले होते.

६) मुंबई विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे विद्या प्रसारक मंडळाने दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांची महाविद्यालयातील तृतीय पंथी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक (Montor) म्हणून नेमणूक केली.

**महाराष्ट्र दिन (१ मे, २०१५)**

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या परिसरात ध्वजारोहन करण्यात आले. विद्या प्रसारक मंडळाचे कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी ह्यांनी या वेळी उपस्थित राहून मानवंदना दिली.

**वार्षिक सत्र (२०१५-२०१६)**

मुंबई विद्यापीठाकडून वार्षिक सत्र २०१५-२०१६ चे प्राप्त झालेले वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

१ जुलै ते १३ डिसेंबर - प्रथम सत्र

२ जानेवारी ते १६ मे - द्वितीय सत्र

दिवाळी सुट्टी - २० ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर

हिवाळी सुट्टी - २५ डिसेंबर ते १ जानेवारी

**विद्यापीठ सत्र परीक्षा : एप्रिल / मे २०१५**

L.L.B. च्या सत्र परिक्षा दिनांक १३ मे रोजी समाप्त झाल्या. आमचे महाविद्यालय हे सर्व सत्र परीक्षांचे केंद्र होते.

**सेन्ट्रल अरसेमेन्ट प्रोग्राम : एप्रिल-मे २०१५**

८ जून, २०१५ ला CAP चे काम पूर्ण करण्यात आले.

**ऑनलाइन प्रवेश अर्ज : २०१५-२०१६**

ऑनलाइन प्रवेश अर्ज हे महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर दिनांक २७ मे, २०१५ पासून उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**UGC उजळणी पाठ्यक्रम**

प्रा. विनोद ह. वाघ हे यू.जी.सी. ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज, औरंगाबाद ह्यांनी आयोजित केलेल्या उजळणी पाठ्यक्रमात (२६ मे पासून) सहभागी होण्यासाठी गेलेले आहेत.

●●●

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय**)

तणावमुक्त ८ वी पर्यंतचा हा प्रवास आहे. या सगळ्याचाच शिक्षणप्रक्रियेवर सकारात्मक परिणाम होऊन हे दहावी-बारावीचे निकाल आहेत हे शिक्षणमंत्र्यांनी सूचित केले आहेच. क्रांतिकारक शिक्षणतज्ज्ञ तरीही समाधानी नाहीत. खेळ, कला यांच्याकडे दुर्लक्ष होतयं असं त्यांना वाटतं. शिक्षणमंत्र्यांनी ताबडतोब यामध्ये लक्ष घालून त्यांचे मार्कही आता एकत्रित मार्कांमध्ये सामील करून घेण्याचा निर्णय घेतला. आता कुठलाही तणाव न येता 'हसत-खेळत' शिक्षणाची पुरेपूर सोय झाली आहे. तरीही त्यामधे गंभीर त्रुटी राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले. हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे जे विद्यार्थी नापास झाले आहेत, त्यांच्या गुणपत्रिकेवर 'नापास' हा शेरा येतो. त्यांची तातडीने पुन्हा परीक्षा घेण्याची सोय तर त्यांनी केलीच, पण नाजूक मनावरती थोडासुद्धा ओरखडा ओढला जाऊ नये म्हणून, यापुढे त्यांच्या गुणपत्रिकेतून ''नापास'' या शब्दाला हद्दपार करण्यात आले. सरकाने आणखी काय-काय करायचे? तरीही शिक्षणतज्ज्ञ अजून नाराजच आहेत. आता पुढची 'क्रांती' आपले शिक्षणमंत्री काय करणार आहेत, याची खूप कल्पना केली तरी उत्तर सापडत नाही. शिक्षण म्हणजे काय याचा खरा अर्थ आपले शिक्षणमंत्री आणि क्रांतिकारक शिक्षणतज्ज्ञांना जो कळला आहे तेच खरे शिक्षण आहे !!!

भारत हा जगातला एकुलता एक असा देश असेल, की जेथे प्रत्येक सामाजिक गट आपण मागासलेले आहोत हे हिरिरीने सांगण्यामध्ये पुढे आहे. अर्थातच हजारो वर्षांच्या अन्यायाच्या कथा याला बळकटी देण्याकरता उपयोगी आहेतच. वसाहतवादी आणि धर्मप्रसारकांना भारतातला जातीयवाद आणि तो अशिक्षित आहे हे दाखवणे आवश्यकच होते. अर्थातच वास्तव हे वेगळे होते. १६ व्या शतकापर्यंत तरी भारत हा एक सुसंस्कृत आणि सर्वच क्षेत्रांमध्ये युरोपमधील इतर देशांपेक्षा बराच पुढारलेला देश होता. धर्मप्रसार करता आलेल्या धर्मप्रसारकांनी जेवढा प्रामाणिकपणा दाखवला, तेवढाही आपले क्रांतिकारक, समाजइतिहासलेखक दाखवू शकत नाहीत. मेकॉलेची प्रसिद्ध शिक्षणप्रणाली या देशात लागू व्हायच्या आधी, उत्तर हिंदुस्थानच्या बहुतेक प्रांतांमधील शिक्षण परिस्थितीचा अभ्यास करणाऱ्या विल्यम अ‍ॅडॅम (William Adam) या धर्मप्रसारकाचे; तसेच महाराष्ट्र, गुजरात, गोवा इ. भागांचा श्री. जार्व्हिस (Jarvis), आणि त्याच सुमारास दक्षिणेकडील भाग म्हणजे मद्रास प्रांताचा केलेला शैक्षणिक अहवाल, यांचे निष्कर्ष अर्थातच धक्कादायक आहेत. अ‍ॅडॅम म्हणतात की या प्रदेशात लाखोंनी शाळा असून प्रत्येक खेड्यामधे शाळा आहे. जार्व्हिस यांनी तर लिहून ठेवले आहे की, कोकणामध्ये तेल्यातांबोळ्यांच्या घरातही शाळा भरायच्या. मद्रास प्रांताचाही अहवाल नेमकं तेच सांगतो. हे सर्व अहवालकर्ते हे एकमेकांना अपरिचितच नाही, तर दूरान्वयेही त्यांचा एकमेकांशी संबंध नव्हता. तळागळात पोचलेली ही शिक्षणपद्धती बघून तत्कालीन बिटिश अधिकारीही आश्चर्यचकित झाले होते. एकंदरीतच ही पद्धत त्यांना अनुकरणीय वाटली, आणि त्याचा त्यांनी इंग्लंडमध्ये स्वीकार करायलाही सुरुवात केली. मुंबई प्रांताच्या १८२०-३० सालच्या शिक्षणपद्धतीच्या संदर्भात लिहिल्या गेलेल्या अहवालांचा अभ्यास करून, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. परुळेकर यांनी, १९४५ साली विवेचनात्मक संशोधन करून ठेवले आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर

"During the early years of the 19th Century, Dr. Andrew Bell and Joseph Lancaster introduced a system of instruction in England which is commonly known as "Monitorial" system or the Madras System". The central idea behind the system was 'instructions of scholars by scholars'. The teaching scholars were called 'Monitors'. Under this system of cheap instruction, England made a very great advance in the instruction of her people. It is generally admitted that Dr. Bell got the idea from what he observed in the indigenous schools at Madras and hence the system was called the 'Madras

system'. Mr. Lancaster got the idea from Dr. Bell. That the system of instruction (the monitorial system) introduced in England by Lancaster and Bell in the early years of the 19th century was of the Indian origins is admitted in many contempery documents. The following extract from a Despatch dated 3rd June 1814 from the Court of Directors to the Governor General in Council of Bengal (Selections of Educational Records, Part 1, p.23) is typical" The mode of instruction that time from immemorial has been practised under these masters has received the highest tribute of praise by its adoption in this country, under the direction of the Reverend Dr. Bell, fromerly Chaplain at Madras and it has now become the mode by which education is conducted in our national establishments, from a conviction of the facility it affords in the acquisition of language by simplying the process of instruction."

In the reports now under consideration, reference is made by William Chaplin, the Commissioner in the Deccan, to "the Lancaster System being originally of Hindu origin". (141). T.B.Jervis recognises that Lancaster" formed his schools on the same (Hindoo) principle (142). He was so much conviced about its utility that he declared : "The Hindoo system is good so far as the expense is concerned and that indeed is a great object--- in respect to every point of economy, it would be folly to deviate" (143).

आणखीन एक ब्रिटिश अधिकारी श्री. पेंडरगास्ट (Mr. Pendargast) यांनी तत्कालीन मुंबईच्या राज्यपालांना १८२१ साली सादर केलेला अहवाल तर अधिकच बोलका आहे. हे चित्र जातीयवादी, वर्गकलह, शोषण वगैरेचे नक्कीच नाही.

"I need hardly mention what every member of the Board knows as well as I do, that there is hardly a village, great or small, throughout our territories, in which there is not at least one school, and in the larger villages more, many in every town and in larger cities in every division, where young natives are tought reading, writing and Arithmetic, upon a system, so economical, from a handful or two of grain, to perhaps a rupee per month to the schoolmaster; according to the ability of the parents, and at the same time so simple and effectual that there is hardly a cultivator or petty dealer who is not competent to keep his own accounts with a degree of accuracy, in my opinion, beyond what we meet with amongst the lower orders in our country; while the more splendid dealers and bankers keep their cake with a degree of ease, consciousness and clearness, I rather think fully to those of any British merchant" (Evidence of 1832, p.468)

"there are schools maintained by the natives in almost every village in Candeish" (Evidence of 1832, p.296).

"There are probably as great a proportion of persons in India who can not write and keep simple accounts as are to be found in European countries" vide Annual Report (1819) of the Bombay Education Society P.11.

"Schools are frequent among native and about everywhere" sixth report (1820) p.21.

ज्या वेळी सरासरी ५०% च विद्यार्थी पास होत होते तेव्हा परीक्षा हे मुलांच्या गुणांचे मोजमापच किती चुकीचे आहे, हे शिक्षणतज्ज्ञ आवर्जून सांगत होते. ९०% निकाल लागल्यावर मात्र हीच परीक्षा बहुतेक शिक्षणतज्ज्ञांना आता आक्षेपार्ह का वाटत नाही हे एक अनाकलनीय कोडे आहे. जातिनिर्मूलनाच्या नावाखाली आरक्षणाच्या माध्यमातून कडवा जातीयवाद आपण निर्माण केला. शिक्षण तळागाळापर्यंत पोचवण्याकरता, दर्जाला सोडचिठ्ठी देऊन, त्याचे आपण यशस्वी सार्वत्रिकीरणही केले. या सर्वच प्रयत्नांचा, तळागाळातल्या विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात किती उपयोग होतो आहे; आणि होणार आहे, हे आजच्या सामाजिक आणि राजकीय चित्रावरून स्पष्ट दिसतच आहे.

'चार भिंतींच्या पलीकडे शिक्षण असतं', हे फक्त टाळ्या मिळवण्याकरता क्रांतिकारक शिक्षणतज्ज्ञांचे आणि

राजकारण्यांचे ठरलेले वाक्य असते. चार भिंतींबाहेर आपल 'कुटुंब' आणि 'समाज' असतो. कुटुंबव्यवस्थेचं आज आपण काय केलंय हे जगजाहीर आहे. शिवाय पालकांनी आपल्या पाल्याच्या भवितव्याचा विचार करणे, किंवा तसे मार्गदर्शन करणे, हेही आता 'महापाप' ठरवण्यात आले आहे. समाजामधील आजचे राजकीय आणि सामाजिक नेतृत्व म्हणावे, तर त्याबद्दल न लिहिलेलेच बरे. माध्यमांचे म्हणावे, तर ती तर फारच पुढारलेली आहेत. कोवळ्या मनाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्यातला 'प्रेमांकुर' कसा जागृत करावा हे दाखवण्यामध्ये सध्या मराठी चित्रपट प्रचंड क्रांती करत आहेत. अशा धाडसी प्रयत्नांबद्दल त्यांच्यावर पुरस्कारांचाही वर्षाव होत आहे. व्यापक शैक्षणिक विकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाकरता कुटुंब, समाज आणि माध्यम यांच्या परिपक्वतेची गरज असते. तसेच विकसित ग्रंथालय आणि संग्रहालयांचीही तेवढीच गरज असते. विकसित किंवा विकसनशील देशांच्या तुलनेने भारत या क्षेत्रातही मागासलेलाच आहे. उठता बसता संस्कृतीच्या नावाने भोकाड पसरणाऱ्यांच्या राजकीय संस्कृतीत या विषयाला फारसे स्थान नाही. पुतळे उभारण्यापलीकडे यांची संस्कृती फारशी जात नाही.

लोकसंख्येमध्ये भारत हा जगातला २ ऱ्या क्रमांकाचा देश आहे. जागतिक स्तरावर तर सोडाच, पण आशिया खंडातीलही पहिल्या २५ विद्यापीठांमध्येही भारत अभावाने दिसतो. संशोधन निबंध, संशोधन पत्रिका यांबाबतीतही भारत हा तळागाळातच आहे. हेच भारतीय विद्यार्थी जेव्हा परदेशात जातात तेव्हा मात्र ते याच स्पर्धेमध्ये खूप वरच्या क्रमांकाला असतात. फरक असतो तो फक्त दर्जेदार शैक्षणिक सुविधा आणि संशोधन नि अभ्यासाकरता पोषक वातावरणाचा. कोणी कोणावर उपकार करत नाही किंवा तसे दाखवतही नाही. फुकट तर काहीच मिळत नाही. या जबाबदारीच्या ओझ्यामुळेच ते स्पर्धेमध्ये अव्वल क्रमांक मिळवतात आणि नोकरी किंवा धंद्यामध्ये चांगले अर्थार्जन करतात. मागासलेपणाची कटोरी घेऊन त्यांना दारोदार फिरावे लागत नाही. गेल्या काही वर्षांमध्ये ज्या थोड्या भारतीय वंशाच्या लोकांना नोबेल पारितोषीक मिळाले, तेही सर्व पाश्चात्त्य विद्यापीठांमध्येच काम करत आहेत.

आरक्षण, अधिकार आणि फुकटेपणा ही सर्व राजकारण्यांनी आपली उंची वाढवण्याकरता वापरलेली सवंग हत्यारे आहेत. दुर्दैवाने भारतामधले सर्वच राजकीय पक्ष या कलेमध्ये वाकबगार आहेत. लवकरच शाळा सुरू होत आहेत, आणि शाळेच्या पहिल्या दिवशीच आपले शिक्षणमंत्री विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत, असे वाचण्यात आले. वास्तविक असले भाकड प्रसंग कटाक्षाने टाळायला हवेत. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यामध्ये क्षणभरही कोणी असता कामा नये. पण सरंजामशाही पगडा असलेले आपले सर्वपक्षीय राजकारणी अजूनही 'मी देणारा' आणि 'तू घेणारा' याच मानसिकतेत गुंतलेले आहेत.

भारताने इंग्रजीला जे काही महत्त्वाचे शब्द दिले आहेत त्यांमधे ''गुरू'' हा शब्द आहे. वास्तविक हा शब्द भारतीय संस्कृतीची एक अत्यंत महत्त्वाची संकल्पना दर्शविणारा शब्द आहे. गुरू म्हणजे 'संस्कृती' आणि 'परंपरा' दोन्हीही आहेत. सहावे किंवा आता सातवे वेतन फक्त व्यावसायिक शिक्षक निर्माण करू शकते, 'गुरू' नाही. धडपड, कष्ट, तणाव यांशिवाय जगात काहीच मिळवता येत नाही. या सगळ्याला सामोरे जाण्याची ताकद खरे शिक्षण देते. विवेक आणि निर्णयक्षमता शिक्षणामुळेच मिळते. हे होऊ शकले नाही, तर डोक्यापासून सगळे शरीरच पुढे ओझी वाहण्याकरताच उपयोगात आणावे लागते. पण शिक्षणाला ओझ्यापासून आणि पास, नापासापासून सोडविणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय नेतृत्वाला जेव्हा याची जाणीव होईल; तोच खरा सुदिन म्हणायला हवा.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.